संस्थापक :
साने गुरुजी

# साधना

शनिवार
९ जानेवारी २०१०
मूल्य रु. १०/-

## युवा अभिव्यक्ती अंक



## 'साधना'ची वेबसाईट पुन्हा सुरू झाली!

अडीच वर्षांपूर्वी सुरू झालेली साधनाची वेबसाईट गेल्या दोन महिन्यांपासून नूतनीकरणासाठी बंद होती. आता ती पुन्हा सुरू झाली आहे, पण तिचा पत्ता बदलला आहे. पूर्वी www.sadhanatrust.com असा होता, आता तो www.weeklysadhana.com असा आहे. पूर्वी ६० वर्षांतील साधनाचे सर्व अंक वेबसाईटवर उपलब्ध होते. आता मार्च २००७ पासूनचे सर्व अंक उपलब्ध आहेत, त्याआधीचे अंक काही तांत्रिक अडचणींमुळे वेबसाईटवर ठेवता येत नाहीत. अर्थात, ते सर्व अंक वाचकांना उपलब्ध करून देण्याची पर्यायी व्यवस्था करणार आहोत, त्याबाबतचे निवेदन लवकरच प्रसिद्ध करू.

सध्या, 'साधना'चा ताजा अंक व मार्च २००७ पासून आतापर्यंतचे सर्व अंक पाहता येतील.

पुढील एक-दीड महिन्यात वेबसाईटवर क्रमाक्रमाने उपलब्ध होणाऱ्या सुविधा :

१) लेखकांच्या नावानुसार अनुक्रमणिका असेल, व प्रत्येक लेखकाच्या नावावर 'क्लिक' केले तर त्याने 'साधना'त (मार्च २००७ नंतर) लिहिलेले सर्व लेख पाहता येतील.

२) वाचकांना 'साधना'शी संबंधित प्रतिसाद, वाद-संवाद व चर्चा-मंथन या सदरांतील लेखन वेबसाईटवरच करता येईल.

३) 'साधना ट्रस्ट'च्या वतीने राबवले जात असलेले अन्य उपक्रम व कार्यक्रम यांची माहिती वेबसाईटवर पाहता येईल.

४) 'साधना'तील विशेष महत्त्वाच्या लेखनाची यादी वेबसाईटवर मिळेल व तेथेच 'क्लिक' करून ते लेख वाचता येतील.

५) 'साधना'तील निवडक लेख इंग्रजीत अनुवादित करून वेबसाईटवर टाकले जातील. Selected articles in English या लिंकवर 'क्लिक' करून ते पाहता येतील.

**– संपादक साधना**

## गोविंदराव तळवलकर अभ्यासवृत्ती

तब्बल २९ वर्षे 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाचे संपादकपद भूषविलेले आणि गेली ५० वर्षे मराठी व इंग्रजी ग्रंथवाचन व अभ्यासपूर्ण लेखन करणारे गोविंदराव तळवलकर, मागील अडीच वर्षांपासून 'साधना'त नियमितपणे लेखन करीत आहेत. त्यांनी साधना साप्ताहिकाला देऊ केलेल्या २५ हजार रुपये देणगीतून, त्यांच्याच नावाने अभ्यासवृत्ती देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

एक किंवा दोन पत्रकारांना/लेखकांना/अभ्यासकांना ही अभ्यासवृत्ती देऊन, त्यातून २०१० च्या 'साधना' दिवाळी अंकासाठी एक किंवा दोन प्रदीर्घ लेख मिळवावेत असा प्रयत्न आहे. अभ्यासवृत्तीसाठी विषयाचे बंधन नाही, पण प्रत्यक्ष भटकंती करून समाजातील दुर्लक्षित प्रश्नांकडे, अथवा सर्वसामान्यांचे जीवन सुखकारक व्हावे यासाठी केल्या जात असलेल्या अभिनव प्रयोगांकडे लक्ष वेधणाऱ्या विषयांना प्राधान्य दिले जाईल.

इच्छुक व्यक्तींनी (वयाची अट नाही) अभ्यासवृत्तीतून करणार असलेल्या अभ्यासाविषयी ५०० शब्दांत टिपण लिहावे; शिवाय यापूर्वीचा अनुभव वा अभ्यास याबाबतही ५०० शब्दांत टिपण लिहावे. ही दोन्ही टिपणं – साधना साप्ताहिक, ९२६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, या पत्त्यावर पाठवावीत. किंवा weeklysadhana@gmail.com आणि vinod.shirsath@gmail.com या पत्त्यांवर इंटरनेटद्वारे पाठवावीत. या संदर्भात अधिक माहिती वा चौकशीसाठी युवा संपादकाशी (विनोद शिरसाठ, Mob. : 9922752534) संपर्क साधावा. पण अर्ज करण्यापूर्वी पुढील बाबींची नोंद घ्यावी :

१) साधना साप्ताहिकासाठी दर्जेदार लेखन मिळविण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ही अभ्यासवृत्ती देत असल्याने, 'वाचनीयता' हा त्या विषयाचा व लेखनाचा पहिला निकष असेल.

२) या अभ्यासवृत्तीचा उद्देश कोणतीही व्यक्ती-संस्था-संघटना यांचा केवळ गौरव करणे वा त्यांना पुरस्कार देणे हा नसल्याने, त्या प्रकारचे लेखन अपेक्षित नाही.

३) विद्यापीठीय स्तरावर पीएच.डी. अथवा एम.फिल. यांच्यासाठी सादर केले जाणारे शोधनिबंध वा तत्सम लेखन अपेक्षित नाही. सैद्धांतिक मांडणी करणारे संशोधन वा संकलन-संपादनही अपेक्षित नाही.

आलेल्या अर्जांची छाननी करून, त्यातील निवडक व्यक्तींशी संवाद साधून अंतिम निर्णय घेतला जाईल.

**– संपादक 'साधना'**

**साधना** **युवा अभिव्यक्ती अंक : ९ जानेवारी २०१०**

## हार्दिक निमंत्रण

प्रिय वाचक,

या अंकाचे प्रकाशन, महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक **विवेक सावंत** यांच्या हस्ते, मंगळवार दि. १२ जानेवारी २०१० रोजी सायंकाळी ६.०० वाजता, साने गुरुजी सभागृह (शनिवार पेठ पोलिसचौकीसमोर, पुणे ३०) येथे होईल. अगत्यपूर्वक उपस्थित राहावे, ही विनंती.

**– संपादक साधना**

## अनुक्रम :


* **संपादकीय :** हम है नये, अंदाज क्यूँ हो पुराना? / ४
* **देशोदेशीचे ज्ञानेश्वर :** श्री. म. माटे / ५
* **२ ऑक्टोबर :** संकल्प गुर्जर / ८
* **चेतन भगतला अनावृत पत्र... :** विनायक पाचलग / १०
* **गणपत, वुई सॅल्यूट यू... :** दीपक जाधव / १२
* **ब्लॉगिंग, तरुणाई आणि मराठी :** प्रसन्न जोशी / १४
* **त्या बैठकीनंतर मनात आलेले काही विचार :** हमीद दाभोलकर / १६
* **पण या कवितेवर कविताच लिहिता येत नाही...! :** अशोक पवार / १८
* **महापूर... :** नीलेश मोडक / २१
* **आर.जे. शुभ्रा** आणि **आर.जे. स्मिता :** स्नेहा अवसरीकर / २४
* **तारुण्याची जाणीव :** चंद्रशेखर पाटील / २७



**९ जानेवारी २०१०**
वर्ष ६२ / अंक २२

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाट**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **ब्ल्यू बर्ड (इंडिया) लिमिटेड**, पुणे ४ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२. E-mail : weeklysadhana@gmail.com • Website : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५.
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ व आतील रेखाचित्रे : **गिरीश सहस्रबुद्धे** Mob. 9850150488
- सहयोगी संपादक मंडळ : **अभय टिळक** (अर्थकारण), **राजा शिरगुप्पे** (सामाजिक), **अवधूत परळकर** (सांस्कृतिक), **संजय भास्कर जोशी** (साहित्य)

# हम है नये, अंदाज क्यूँ हो पुराना?

पंचविसाव्या युवक दिनाच्या (१२ जानेवारी) पार्श्वभूमीवर हा अंक प्रकाशित होत असला तरी, हा अंक नियोजनपूर्वक तयार केलेला नाही. या अंकासाठी लेखक व विषय तर ठरवलेले नव्हतेच, पण असा अंकही काढायचे ठरवले नव्हते. मागील महिनाभरात चार युवकांचे लेख 'साधना'कडे आले, तेव्हा युवक दिनाच्या निमित्ताने अंकात एक विभाग करण्याचे ठरवले, आणि त्यासाठी आणखी पाच युवकांना 'तुम्हांला महत्त्वाचं वाटतं असं काहीतरी सांगा' असे सुचवले. त्यांच्याकडून आलेले लेख वाचून संपूर्ण अंकच युवक दिनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्याचे ठरवले.

या अंकाला विषय म्हणून मध्यवर्ती सूत्र किंवा कल्पना असे काही नाही. पण तरीही या अंकातील सर्व लेखांना जोडणारा समान धागा आहे. तो म्हणजे, या सर्व नऊ युवकांच्या लेखनातून सामाजिक भान व मूलभूत काम करण्याची ऊर्मी यांचे दर्शन घडते.

या अंकातील लेख १७ ते ३४ या वयोगटातील तरुणांनी लिहिले आहेत. हे सर्व युवक वेगवेगळ्या क्षेत्रांतील आहेत, पण ते त्या त्या क्षेत्रांतील तरुणाईचे प्रतिनिधित्व करणारे नाहीत. त्यांनी चाकोरी मोडलेली नसली तरी ते चाकोरीत अडकलेलेही नाहीत. हे सर्व जण आपापल्या क्षेत्रात अतिशय गांभीर्याने वेगळे काही करू इच्छितात.

संकल्प आणि विनायक तर अनुक्रमे सतरा-अठरा वर्षांचे आहेत, म्हणजे आता कुठे त्यांना 'युवक' हे संबोधन लावता येईल. त्यांनी महात्मा गांधी व चेतन भगत या 'आयडॉल्स'च्या संदर्भातून जे लिहिलेय, ती कोवळ्या वयातील परिपक्वतेची खूण आहे.

गणपत या मित्राविषयी दीपकने लिहिलेला लेख प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या कोणालाही ऊर्जा तर देईलच, पण गणपतच्या समाजनिष्ठ असण्याचे अधिक कौतुक करील. अशोकने सांगितलेला अनुभव तळागाळातील दाहक वास्तव अधोरेखित करणारा आहे. नीलेशने त्याच्या लेखातून आजच्या तरुणाईवर टाकलेले कवडसे, अंतर्मुख करणारे आहेत. हमीद आणि चंद्रशेखर यांनी राजकीय-सामाजिक क्षेत्रांत काम करू पाहणाऱ्यांपुढे मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रसन्न आणि स्नेहा यांनी अगदीच वेगळ्या क्षेत्रांच्या सामर्थ्याकडे लक्ष वेधले आहे.

या सर्व युवकांच्या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यांची मांडणी केवळ प्रामाणिक व मुद्देसूद नसून, बांधेसूद आहे. त्यात काट-छाट करायला जवळपास वाव नव्हता! ही अभिव्यक्ती इतर तरुणाईला अंतर्मुख करणारी ठरू शकेल आणि मोठ्या माणसांना स्वत:चे विचार तपासून घ्यायला उद्युक्त करील. या युवकांच्या क्षमता पाहता, समाजात असे अनेक युवक आहेत, हे तर उघडच आहे. त्यांच्या क्षमतांचा पुरेपूर विकास कसा होईल आणि त्यांना कसे जोडता येईल हा खरा प्रश्न आहे. श्री. म. माटे यांचा ५० वर्षांपूर्वीचा लेख पुनर्मुद्रित करण्यामागे तरुणाईच्या प्रचंड क्षमतेचे भान अधोरेखित करण्याची सूचकता आहे.

पुणे शहरातील 'रेडिओ सिटी' आणि 'रेडिओ मिर्ची' या स्टेशन्सवर रात्री उशिरा ते पहाटेपर्यंत, काही गाणी पुन्हा पुन्हा ऐकवली जातात. गेल्या सहा महिन्यांपासून, 'दिल चाहता है' या दहा वर्षांपूर्वीच्या हिंदी सिनेमातील 'हम है नये, अंदाज क्यूँ हो पुराना' हे गाणे तर रोज दोन-तीन वेळा ऐकवले जाते. जावेद अख्तर लिखित या गाण्यात तरुणाईचा जोश आणि आवेश तर आहेच, पण तारुण्याची खास लक्षणेही आहेत. 'हम है नये, अंदाज क्यूँ हो पुराना' हे गाणे चित्रपटाच्या कथानकात तितकेसे समर्पक वाटत नाही; कारण हा 'अंदाज', वर्तन व विचार या दोहोंशी संबंधित आहे. मागच्या पिढीपेक्षा वेगळा विचार करणे, वेगळे नीतीनियम बनवणे आणि कालसुसंगत बदल करताना जुन्या रूढी-परंपरा मोडून काढणे, हे तारुण्याचे प्रमुख लक्षण असते. त्यामुळे 'अंदाज' पुराना नसलेल्या युवकांना विचार करण्याचा व ते व्यक्त करण्याचा आनंद पुरेपूर उपभोगायला मिळतो, तेव्हा तो तारुण्याचा सर्वांत मोठा सन्मान असतो. तरुणाईचा असा सन्मान करण्यात 'साधना'ला आनंदच वाटेल!

■

**स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां। करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना**



श्री. म. माटे

# देशोदेशीचे ज्ञानेश्वर

**वारसा**

**‘संत’ आणि ‘सुधारक’ यांचा वारसा सांगत असतानाच त्यांची चिकित्सा करून, विज्ञानाकडे सजगपणे पाहायला शिकवणारे लेखक अशी श्री. म. माटे यांची ओळख सांगता येईल. त्यांनी १९५० मध्ये लिहिलेला ‘देशोदेशीचे ज्ञानेश्वर’ हा ‘साहित्यमंजरी’ या पुस्तकातील लेख पुनर्मुद्रित करणे औचित्यपूर्ण वाटते.**

**– संपादक**

सृष्टीची लहर कोठे कशी लागेल हे खरोखरच सांगता येत नाही. अमूक प्रतिभासंपन्न मनुष्य अमूकच ठिकाणी आणि अमूकच काळी का जन्माला यावा, याचे समर्पक उत्तर कोणी दिले आहे, असे वाटत नाही. संस्कृतीची वाढ ज्या देशात झाली आहे, त्या देशात प्रतिभासंपन्न माणसे जन्माला येतात, हे मात्र खरे आहे. अत्यंत मागासलेल्या आणि असंस्कृत देशात सृष्टी असली माणसे जन्माला घालीत नाही; पण पुढारलेल्या आणि सुसंस्कृत अशा सर्वच देशांत आपल्या या संपत्तीचा देव्हारा सृष्टी सजविते, असे मात्र नाही.

संस्कृतीची, म्हणजेच पर्यायाने ज्ञानाची, वाढ झालेल्या देशात प्रतिभाशाली माणसे जन्माला येतात याचे कारण, काही लोकांच्या मताने असे असते, की निरनिराळ्या सामर्थ्याची, तेजांची, भावनांची वाढ अशा देशांत अव्याहत चालू असते; त्या वाढीत सृष्टी एक मोठा टप्पा अचानक गाठते आणि प्रतिभाशाली माणसे उत्पन्न करते. हा वाढीच्या टप्प्याचा न्याय भौतिकशास्त्रांच्या आधुनिक अभ्यासात पुष्कळदा खरा झालेला दिसून येतो. ज्या देशांत शास्त्रांची प्रगती झालेली आहे, त्याच देशांत त्यांचा अभ्यास चालू राहतो; आणि ज्यांची कल्पनाशक्ती त्या अभ्यासात गर्क असते, ते संशोधक एखादा शोध अकल्पितपणे लावतात. ही कारणांची मीमांसा पटण्यासारखी आहे.

पण पुष्कळदा असे आढळून येते, की ज्या शोधाला किंवा नवीन विचाराला कसलाही आगापिछा नाही, आणि ज्याला ‘प्रगतीचा टप्पा’ असे नावही देता यावयाचे नाही, तो नवा शोध किंवा विचार एखाद्या देशात अकल्पितपणे प्रकट होऊन जातो; आणि प्रयत्न करूनही, त्याच्या या आगमनाचे कारण सांगता येत नाही. केवळ सृष्टीला भावले म्हणूनच तिने एखादे प्रतिभाशाली मन त्या काळी व त्या स्थळी धाडून दिले आणि नव्या शोधाचा किंवा विचाराचा अवतार झाला, असे स्वच्छ दिसून येते.

टॉलेमी, ॲरिस्टॉटल इत्यादिकांच्या विचारांची कैची युरोपियन लोकांच्या मनावर सतराशे वर्षे गच्च बसलेली होती. एक बायबलचे तरी ऐकावे, किंवा त्यातील विधानाशी विसंवादी नसलेले असे टॉलेमीचे किंवा ॲरिस्टॉटल्‌चे ऐकावे, असा दंडकच पडून गेलेला होता. ‘यात आपले काही चुकत आहे किंवा याने आपले काही अहित होत आहे’, अशी शंकासुद्धा कोणाच्या मनाला सतरा शतके शिवली नाही! असे असता रॉजर बेकन या सोळा वर्षांच्या पोराला ‘अरिस्टॉटलचे मत चुकले आहे, असे बेधडकपणे म्हणण्याचे स्फुरण प्राप्त व्हावे’, ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे. पण इतिहासात हे नमूद झाले आहे, की एवढ्या बालवयात रॉजर बेकन याने ‘ॲरिस्टॉटलचे सिद्धांत चुकीचे आहेत’ असे साहसाचे विधान केले, तेव्हा लोकांना जे ‘साहस’ वाटले, ते साहस नसून ‘धैर्य’ होते. रॉजरला बुद्धीचे देणे एवढे मिळाले होते, की प्रस्थापित मतसंकेत उद्‌ध्वस्त करावयास काहीच हरकत नाही असे त्याला वाटू लागले.

आता बुद्धीचे हे स्वतंत्र स्फुरण त्याच्याच ठिकाणी का प्रकट व्हावे? आणि ते इंग्लिश भूमीतच का दिसावे? याचे कारण कोणी सांगू शकेल काय? शिवाय रॉजर याला हे स्फुरण इतक्या लहान वयात व्हावे, याचे तरी कारण काय? पुष्कळ अभ्यास करून, तुलना करून, पोक्त वय झाल्यावर, बुद्धीला काही निर्णय प्राप्त होणे, हे बरोबर आहे. परंतु बुद्धी अगदीच अपक्व असताना म्हणजे, वयाप्रमाणे पाहता बुद्धी अपक्व राहणेच स्वाभाविक असताना, त्याला एकाएकी तर्काचे एवढे बल प्राप्त व्हावे, याचेही मोठे नवल वाटते.

भौतिक विद्येची आपल्याकडेही पुष्कळ आवश्यकता होती. तिकडल्याप्रमाणेच ठराविक मतांची कैची येथे बळकट बसलेली होती. पण युरोपातील विचारांची कैची ढिली करण्याचे सृष्टीने मनावर घ्यावे, रॉजरच्या मुखाने तिने आपले नवे मनोगत बोलून दाखवावे आणि भारताच्या बाबतीत मात्र तिने तेव्हा आणि पुढेही मुग्धच राहावे, याचे खरोखर नवल वाटते. संस्कृतीची वाढ अवश्य होती, असे धरले तर भारतातील आपली संस्कृती तेव्हाच्या युरोपियन संस्कृतीपेक्षा कांकणभर सरसच होती. मग सृष्टीने हे नवे बालक आमच्या पदरी घालावयाच्याऐवजी इंग्रज लोकांच्या पदरी का घातले, कळत नाही. बरे, तेव्हाचे इंग्रज लोक अशा बालकाला पदरात घ्यावयास पात्र किंवा उत्सुक होते असे म्हणावे, तर तेही खरे

नाही. या रॉजर बेकनच्या नव्या कल्पना म्हणजे शुद्ध पाखंड आहे, असेच तेव्हाच्या इंग्रजांनी ठरवले आणि मुंडण करून बैरागी बनलेल्या या ज्ञानराजाला त्यांनी एकदा आठ वर्षे आणि एकदा दहा वर्षे म्हणजे अठरा वर्षेपर्यंत कारावासात खितपत ठेवले! भौतिक विद्येची नवी कल्पना काढली म्हणून आमच्याकडील एखाद्या पंडिताला कोणी बंदिवासात टाकले असे इतिहासात तरी दिसत नाही. भौतिक विद्येचे काही शोध आमच्या पुरातन शास्त्रज्ञांनी लावलेले होते, पण त्यांचा छळ झाल्याचे ऐकिवात नाही. मग अशा अनुकूल भूमीत रॉजरसारख्याचा जन्म का होऊ नये? हा बालवयीन ज्ञानेश्वर इंग्लंडात जन्मला!

भौतिक वस्तूंवर आधिपत्य गाजविणाऱ्या नियमांपैकी काहींची दारे सृष्टीने गॅलिलिओला किलकिली करून दाखविली; आणि मग नव्या ज्ञानाची ओळख झालेला हा सोळा वर्षांचा पोर, थोरामोठ्यांची अब्रू घेऊ लागला. प्रार्थनामंदिरात एक उंचच्या उंच लामणदिवा सारखे हेलकावे खात होता. सहस्रावधी लोक त्याचे हेलकावे आदराने पहात आणि प्रार्थना मंदिराचे एक दिव्य वैभव म्हणून त्याला आदराने नमस्कार करीत. पण या लहानशा मुलाने आपल्या नाडीवर हात ठेवला, दर ठोक्याला झोका दोन्ही टोकांना कुठपर्यंत जातो व परत येतो हे पाहिले आणि गतिशास्त्राचा एक अभिनव सिद्धांत सांगून टाकला; त्याने नव्या शास्त्रालाच आरंभ करून दिला.

थोडा मोठा होताच, म्हणजे पुढे चारच वर्षांनी पिसा येथील झुकत्या मनोऱ्यावरून दोन विषम वजनाचे पदार्थ खाली सोडून व ते एकाच वेळी जमिनीला लागतात, हे दाखवून देऊन ॲरिस्टॉटलपासून चालत आलेल्या गतिविषयक कल्पना त्याने एकाएकी उद्ध्वस्त करून टाकल्या. कॉलेजचे प्राध्यापक त्याच्यावर रुष्ट झाले. ॲरिस्टॉटलला लटके ठरवणारा हा कोण, असे सनातनी लोक गर्जून ओरडू लागले. पण प्रत्यक्ष प्रयोगात, अत्यंत विषम वजनाचे दोन्ही पदार्थ भूमीला एकाच वेळी येऊन लागले, हे त्यांना नाकारता येईना. भांडवल बुडाल्याचे दुःख त्यांना झाले. दीड सहस्र वर्षे वयाच्या मुनिवर्यांचा पाणउतारा झाला, हे शल्य त्यांना बोचू लागले; आणि त्यातही एका पोरसवदा माणसाने हे करावे, ही घशांत पडलेली कडू गोळी गिळावयास त्यांचा घसा घोटवेना. अलौकिक किमयेत मौन मानणारी सृष्टी बाजूला उभी राहून, या साऱ्या लोकांची उडालेली दुर्दशा पाहून खचितच मनापासून हसत असली पाहिजे! हा ज्ञानेश्वर इटलीत उदयाला आला!

केल्विन या बालकाच्याद्वारे सृष्टीने त्याच्या बापालाच फजित केले. बाप युनिव्हर्सिटीत मोठा प्राध्यापक होता. युनिव्हर्सिटीतील मुलांना घालावयाची उदाहरणे तो घरून लिहून नेत असे. पण मुलगा विल्यम हा ती सारी उदाहरणे बापाला घरच्या घरी आधीच सोडवून दाखवीत असे. या वेळी मुलाचे वय पुरते दहा वर्षांचेसुद्धा नव्हते. एकदा एक भारीच अवघड उदाहरण- (जे बापाला युनिव्हर्सिटीतही सुटले नाही) मुलगा सोडवावयास बसला. रात्रीची जेवणे होऊन सारेजण झोपी गेले. अर्थात मुलगाही निजला असेल, असे घरातल्या माणसांना वाटले. पण त्याला त्या उदाहरणाचे वेड लागले होते. मध्यान्हीच्या सुमारास माडीवरच्या आपल्या खोलीतून मुलगा मोठ्याने ओरडला, 'सुटले, उदाहरण सुटले!' बाप चटकन् वर गेला आणि पाहतो तो, दगडी पाटीवर उदाहरणाची रीत मुलाने खरडलेली दिसली! त्याने बाराव्या वर्षी लॅटिन भाषेतील 'देवांचा संवाद' या पुस्तकाचे भाषांतर करून बक्षीस मिळवले; आणि सोळाव्या वर्षी 'पृथ्वीचे स्वरूप' या विषयावर एक विद्वत्ताप्रचुर प्रबंध लिहून मोठीच वाहवा मिळविली. या निबंधाचा उपयोग पुढे पन्नास वर्षे तो मधून मधून करीतच होता. बावीसाव्या वर्षी ग्लासगो येथे सृष्टिविज्ञानाचा प्राध्यापक म्हणून त्याची नेमणूक झाली. त्याची व्याख्याने सूत्ररूप प्रमेयांनी इतकी भरलेली असत, की अनेक शास्त्रज्ञांनी त्यांतील कित्येकांवर आपल्या संशोधनाच्या इमारती उभ्या केल्या. समुद्राच्या पोटातून जाणाऱ्या तारेचा शोध यानेच लावला. सृष्टीने याला लहानपणापासूनच स्वतंत्र बुद्धीचे स्फुरण अर्पण केलेले होते. ज्ञानेश्वराप्रमाणेच हाही फार थोर पुरुष म्हटला पाहिजे.

'बिनतारी संदेश' ही शब्दसंहती आता आपल्या पाठातली झाली आहे. पण बिनतारेने संदेश जातो म्हणजे काय होते, हे फार थोड्या लोकांना माहीत असते. अमेरिकेत बसलेल्या माणसाच्या तोंडून निघालेला शब्द क्षणात हिंदुस्थानात बसलेल्या माणसाला ऐकू यावा, ही केवढी विचित्र किमया आहे! जग जवळ जवळ येत चालले आहे, या विधानाचा खराखरा अर्थ बिनतारी संदेशाने आपल्या चांगला ध्यानात येतो. या दोन स्थळांच्या दरम्यान सप्तसमुद्र भरलेले आहेत; आणि नवखंड पृथ्वी पसरलेली आहे. पण यांना न जुमानता अमेरिकन प्रेसिडेंटने टेबलावर मारलेली टिचकी हिंदुस्थानात तत्क्षणीच ऐकू येते. विधात्याने अंतरिक्षात पेरून ठेवलेले सूक्ष्म न्याय माणसाने ओळखीचे करून घेतले आणि मानवी जीवनात प्रचंड क्रांती करून टाकली. ज्या मार्कोनीने हे केले, तो या शोधाच्या वेळेस केवळ बावीस वर्षांचा होता. मार्कोनीची संशोधनाची साधने अगदीच ओबडधोबड होती, पण त्याच्या बुद्धीची झेप अंतराळाइतकीच मोठी होती. 'माझ्या बाही म्या व्योम कवळिले' असे ज्ञानेश्वरांनी आपल्या एका ओवीत म्हटले आहे. त्याचा पारमार्थिक अर्थ काय, ते त्यांना खचितच माहीत होते; पण मार्कोनीने 'व्योम कवळिले' हे मात्र सामान्य जनांनासुद्धा कळून आले. एक मैलाच्या अंतरावर हा प्रयोग त्याने करून पाहिला, मग दोन मैलांचे अंतर ठेवून तो प्रयोग केला. तो यशस्वी झाला. तिकडे टिचकी वाजली, की इकडे ऐकू येऊ लागले. इटलीतून उठून आपल्या साहित्यासह तो इंग्लंडात आला; आणि ब्रिटिश सामुद्रधुनीवरून त्याने आपला संदेश युरोपच्या भूमीवर एका निमिषात ऐकवला. जग खरोखरच जवळ आले. हा अद्भुत शोध बावीस वर्षांच्या मुलाने लावला! हा केवढा ज्ञानेश्वर होय!

आणखी एक मौजेचे उदाहरण सांगतो. आर्थर यंग या मुलाचे कौतुक सृष्टीने असेच केले. आपल्याजवळची अनेक

सामर्थ्ये याच्या बुद्धिपिंडाच्या बनावटात तिने आरंभीच खोचून ठेवली. तो दोन वर्षांचा झाला नाही, तोच आपल्या बोबड्या वाणीने भराभर वाचू लागला आणि लोक नवल करू लागले. सहा वर्षांच्या वयाला 'डेझरटेड व्हिलेज' हे गोल्डस्मिथचे काव्य त्याने पाठ म्हणून दाखवले. पण याच्याही आधी, म्हणजे चौथ्या वाढदिवसाच्या पूर्वी त्याने सगळे बायबल दोनदा वाचून दाखवले. लॅटिन आणि ग्रीक या पुरातन भाषा लवकरच त्याच्या घरी पाणी भरू लागल्या आणि पौगंड दशेतच तो निरनिराळ्या भाषा बोलू लागला. सारे लोक त्याच्याकडे विस्मयाने पाहू लागले. एकवीस वर्षांचा असताना त्याने 'डोळा' या विषयावर निबंध लिहिला. आणि त्याची गणना विद्वानात होऊ लागली. मौज अशी, की आपल्याजवळची सर्वच वस्त्राभरणे सृष्टीने त्याच्या अंगावर घातली आहेत, असे दिसून आले. नामांकित डॉक्टरांत त्याची गणना होऊ लागली. कुस्तीच्या हौद्यात उतरला म्हणजे तो भल्याभल्यांची अब्रू घेऊ लागला. गायनाच्या मैफलीत त्याचे सुस्वर गायन केव्हा सुरू होते, याची वाट लोक पाहू लागले. कोणतीही कलाकृती असो, आर्थर यंग याने दिलेला निर्णय एकदम सर्वसंमत होऊ लागला. 'समुद्राची भरती' आणि 'नौकानयन' या विषयावरचे त्याचे निबंध चांगल्या शास्त्रज्ञांनी आदरबुद्धीने वाचले; आणि व्यावहारिक कौतुकाची गोष्ट अशी, की इन्शुअरन्स कंपनीच्या ॲक्चुअरीचे कामसुद्धा त्याने इतरांपेक्षा फार चांगले बजावले. ऑर्थर यंग ही एक सृष्टीची मोठी गंमतीदार कलाकृती समजली पाहिजे.

न्यूटन हा एका शेतकऱ्याचा पोर. चौदा वर्षांच्या वयापर्यंत त्याची आणि विद्येची तोंडओळखसुद्धा झालेली नव्हती; पण या वयातच त्याने एक पाणघड्याळ आणि सावलीचे घड्याळ तयार केले. किती वाजले हे या घड्याळावरून बरोबर कळत असे. वाऱ्याची शक्ती मोजता येईल, असे त्याला या वयातच वाटू लागले. वारा ज्या दिशेने वाहत होता त्या दिशेने त्याने एक लांब उडी मारली व ते अंतर मोजून ठेवले. मग वाऱ्याच्या उरफाट्या दिशेने त्याने आणखी एक उडी मारली अणि तेही अंतर मोजून पाहिले. या दोन अंतरात पडलेली तफावत वाऱ्याच्या शक्तीमुळे पडलेली आहे, असा तर्क न्यूटनने बांधला. यानंतर त्याला शाळेत घातले. तेथे युक्लिडचे सिद्धांत त्याने भराभर वाचून काढले व पुस्तक बाजूला टाकून दिले. तो म्हणाला; 'हे सिद्धांत सिद्ध करण्याची एवढी खटपट युक्लिडने कशाला केली कुणास ठाऊक? यात सिद्ध करण्यासारखे काय आहे? त्या गोष्टी स्वयंसिद्धच आहेत. हा शुद्ध पोरखेळ आहे!' याच वयात त्याने एक बिलोरी काच आणली आणि सूर्याच्या किरणांचे पृथक्करण केले. पांढऱ्या प्रकाशात सात निरनिराळे रंग आहेत, हा शोध त्याने याच वयात लावला. या वेळी तो केवळ सतरा वर्षांचा होता. बायनॉमिअल थिअरम म्हणून म्हणतात तो न्यूटनने तेविसाव्या वर्षी शोधून काढला; आणि चोवीस वर्षांच्या वयाला 'इंटिग्रल कॅलक्युलस' हा गणिताचा प्रकार त्याने शोधून काढला. पृथ्वी आणि चंद्रबिंब यांच्यातील आकर्षणाचा नियम याच वेळी त्याच्या लक्षात आला; आणि याच दोन वर्षांत गुरुत्वाकर्षणाचा नियमही त्याने शोधून काढला. ज्ञानेश्वराने 'जीविताची इतिकर्तव्यता संपली' असे पाहून ज्या वयात समाधी घेतली त्या वयाच्या आंतच न्यूटनने हे सारे शोध लावले होते. आपले किमयेचे पुस्तक सृष्टीने आपल्या हातांत घट्ट धरून ठेवले होते. न्यूटनने बालवयातील लडिवाळपणाने त्या पुस्तकाची अनेक पाने ओढून वाचून पाहिली; ज्ञानेश्वरांचे वाचन कदाचित याहूनही अधिक गूढ अशा ग्रंथांचे असेल; पण प्रापंचिकांना जो ग्रंथ त्यांनी प्रत्यक्ष दिला आहे त्याची योग्यता न्यूटनच्या ग्रंथाइतकी खचितच नाही!

आधुनिक जग कोणत्या अर्थवादाने भिरभिरू लागले आहे, हे आपल्याला माहीत आहे. कार्ल मार्क्सच्या सिद्धांताची छाप देशोदेशींच्या समाजजीवनावर गडद बसत चालली आहे. शंभर वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या महापुरुषांची सावली आता सर्व भूलोक व्यापून टाकील असे स्वच्छ दिसत आहे. ध्येयाचा तपशील आणि मार्गांचा तपशील या बाबतीत कोणाचे काही मतभेद असू शकतील; पण अखिल मानवयोनीला अन्न, वस्त्र, आणि निवारा यांची जोड लाभून मन- बुद्धीच्या सामर्थ्यबीजाच्या विकसनाला आणि विकसित झालेल्या सामर्थ्याच्या वापराला भरपूर संधी मिळून मानवयोनी एका शाश्वत काचातून मुक्त होत जाईल, असे आता स्पष्ट दिसते. हा काच दुर्दैवाने होतो, कर्मविपाकाने होतो, परमेश्वरी प्रक्षोभाने होतो इत्यादि अगतिकत्वातून निघालेली ज्ञाने, आता गलितगात्र होऊन बसत आहेत. ज्या आर्थिक तत्त्वज्ञानाची प्रभा अशा रीतीने फाकत आहे ते ज्ञान कार्ल मार्क्सला केव्हा स्फुरले, हे ऐकले तर आश्चर्य वाटेल. या वादातील मुख्य प्रमेय त्याला सव्वीसाव्या वर्षी स्फुरले! खरोखर कार्ल-मार्क्स हा आधुनिक काळातील प्रचंड ज्ञानेश्वर होय!

ज्ञानेश्वरांनी असेही म्हटले आहे की, 'सर्व तिमिरांचा नाश झाला आहे, जगदाकार धवळले आहे' त्यांच्या या गूढ प्रमेयाचा अर्थ अत्यंत उदात्त असला पाहिजे; आणि गोचर वस्तूंच्या पलीकडे असलेल्या सूक्ष्मतम रज:कोशात वावरत असताना प्राप्त झालेल्या ज्ञानदीप्तीत त्यांनी हे उद्गार काढले असले पाहिजेत; पण पाहू गेले तर जड काय किंवा सूक्ष्म काय, सगळा विश्वाचा कंद एकाच वस्तूच्या नाभिकमलातून बाहेर पडलेला आहे. म्हणून 'जड' म्हणून अवहेलित झालेली ज्ञानेसुद्धा खरीखरी सूक्ष्म आणि आत्मिक बलाचीच आहेत. ही ज्ञाने प्रसवणारे अनेक बालयोगी सृष्टीने देशोदेशी जन्माला घातलेले आहेत आणि मानवी जीवन समृद्ध करून सोडले आहे. म्हणून ज्ञानेश्वरांच्या संबंधाने नितांत आदरबुद्धी बाळगणारांनीसुद्धा या देशोदेशीच्या ज्ञानेश्वरांची 'वळखण' करून घ्यावी आणि मानवयोनी सध्या आहे त्यापेक्षा अधिक सुखी करावी.

■



संकल्प गुर्जर

# २ ऑक्टोबर

युवा अभिव्यक्ती

**बावीस दिवसांच्या प्रवासात शेवटचे सात तास हा क्लायमॅक्स. 'मोहनदास करमचंद गांधी' नावाचा माणूस अधिक सखोलपणे आणि वेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यासण्याची गरज, ही याच दिवसांची मिळकत! कधीकधी खूप उदास वाटतं. मनात सुन्नता भरून येते. सिनिक व्हायचं नाही असं बजावत आजूबाजूच्या भयाण आणि निराशाजनक वास्तवाकडे सतत नजर खेचली जाते. पण... नैष्कर्म्याचं तत्त्वज्ञान उगाळणारे आम्ही नाही!**

सर्व पोस्टर्स नीटपणे ठेवून रूम लॉक करून आम्ही बाहेर आलो. दिवसभर असलेला ताण आता जाणवत नव्हता. रिकामं रिकामं वाटत होतं. काय बोलावं सुचत नव्हतं. नि:शब्दपणे चालत फर्ग्युसनच्या सर्कलजवळ आलो. तिथून डावीकडे गार्डन दिसत होतं. आतमध्ये अभ्यास करणारे ग्रुप्स बसले होते. पण तिथे काहीतरी हरवल्यासारखं वाटत होतं. थोडं पुढे आल्यावर उजवीकडे जमिनीवर असलेली खडूची पांढरी रेघ... चैतन्याने ओसंडून वाहणारं फर्ग्युसन आम्हांला उदासीन वाटत होतं. कॉलेजच्या बाहेर पडलो. रस्त्यावरील गर्दीत हरवून गेलो. आपला रस्ता कोणता, हा प्रश्न सरसरत गेला.

क्रायसिस ऑफ आयडेंटिटी! अस्मितेचा शोध घ्यावाच का? मी कोण? गुंतागुंतीच्या प्रश्नांनी मनात कोलाज केलेलं असतं. अस्मितेचा शोध आणि आविष्कार अथांग आहेत; म्हणून ते शोधण्याचा प्रवासही अनंत आहे. २ ऑक्टोबर १८६९ ला जन्मलेला एक मोहनदास असाच एक प्रवासी होता, म्हणून तो प्रेरक असतो. रस्त्यावरचा सांगाती असतो. गांधीजींचा शोध अर्थातच नुसता रक्त-हाडा-मांसाच्या एका ऐहिक अस्तित्वाचा शोध राहत नाही; व्यक्तिकेंद्रित राहत नाही. तो माझ्या संस्कृतीच्याच शोधात रूपांतरित होतो, म्हणजे माझ्या स्वत:च्या सुद्धा! तेव्हा महात्माजी हे एका वैचारिक, आध्यात्मिक शक्तीचं रूप बनलेलं असतं. या संस्कृतीनं धारण केलेलं विसाव्या शतकातलं एक सर्जनशील रूप! म्हणून प्रेरक त्या महात्म्याचा जन्मदिवस : २ ऑक्टोबर. जागतिक शांतता दिवस. महात्म्याच्या शोधासाठी मिळालेलं निमित्त!

साधारणत: १० सप्टेंबरच्या सुमारास 'सोशियो क्लब'मध्ये २ ऑक्टोबरविषयी पहिल्यांदा चर्चा झाली... काय करायचं? कसं? कुठे?... मग ब्रेन स्टॉर्मिंग. कल्पना. कल्पनाच कल्पना. कल्पनांवर कल्पना. कल्पनेतून कल्पना. पोस्टर प्रदर्शन. पोस्टर्स तयार करायची? कोण काढणार? - पहिलाच प्रश्न. ऑफकोर्स आपण. ओके. एक प्रोजेक्ट ठरला. त्यावर काम चालू. मुख्य प्रश्न : कशाची चित्रं काढणार?

मग शांतता, अहिंसा इ. संदर्भात चित्रं जमविणं. नेटवर बसायला आणखी एक निमित्त. आपण काही वेगळं करूया. मान्य. पुन्हा विचार... असं करत करत काही चित्रं सिलेक्ट केली. रंग, ब्रश, कागद इ.ची व्यवस्था. फोटोग्राफी डिपार्टमेंटचा घरासारखा वापर म्हणजे घरासारखाच पसारा! तिथे अभ्यास फारसा काही चालू नसतो म्हटल्यावर मस्ती करण्याचा फुल ऑन चान्स. तो सोडणाऱ्यांपैकी आम्ही नक्कीच नाही.

चित्रं काढण्याचं, रंगवण्याचं काम चालू झालं. २० सप्टेंबर नंतर कामाला गती येऊ लागली. कात्री, फडकं, प्लेट्स, प्लॅस्टिक, दोरा, खिळे इ. गोष्टी पण पोस्टर्सना लागतात, हे आम्हांला कळलं. त्यातच विपुलने एका पथनाट्याची (हिंदी) स्क्रीप्ट आणली. त्यावर काम. बघता बघता काम करणाऱ्यांची संख्या पस्तीसपर्यंत पोचली. अफगाणिस्तानातील मुस्तफा, मतीन पासून श्रीलंकेतील राजिकापर्यंत सर्वजण तिथे यथाशक्ती काम करत होते. मणिपूरच्या निओ, लिऑन, केशवपासून कर्नाटकातील अदिती, एम.पी.ची आयुषी... सर्वांनाच बांधून ठेवणारं काहीतरी होतं. कम्युनिस्ट निधिन डोनाल्डपासून कोणत्याच आयडिऑलॉजीशी बांधिलकी नसणारे... असे सर्वजण एका जिद्दीने झटत होते. सर्वांवर कडी म्हणजे सोशियोच्या सुनीता मॅडमचा उत्साह आम्हांला लाजविणारा होता. आम्ही तर हैराणच झालो होतो, त्यांचा उत्साह बघून!

विषयांची एक चौकट होती, पण त्यानंतर स्वत:चं डोकं चालविण्याचं स्वातंत्र्य होतं. त्यातून अनेक नवे विचार स्फुरले. नवी चित्रं आली. सलग पाच दिवस दुपारचं जेवण मिस करणं तसं फार कठीण नसतं. फक्त तेवढी झिंग हवी. केरळी भाताची अमेझिंग चव पहिल्यांदा तिथेच चाखली आणि सकाळी साडेसहा वाजता भिजवलेले कपडे, रात्री सव्वाअकराला धुण्याचा अनुभव पण याच दिवसांचा!

स्ट्रक्चरल व्हायोलन्स, कम्युनल व्हायोलन्स, विविध प्रकारचे भेदभाव, विषमता, शॉविनिझम, फॅनॅटिझम इ. विविध बाबींवर पोस्टर्स बनवली गेली. त्यानिमित्ताने त्या विषयांवर चर्चाही घडल्या. 'Celebrate the differences' सारखी idea त्यातच जन्माला आली. पर्यावरणीय प्रश्नांवरही चर्चा झाली. तसं चर्चेला काही लिमिट्स नव्हती. मी, कल्याणी, निधिन इ.नी काय काम केलं? (तर इतरांना डिस्टर्ब करण्याचं.) म्हणजे जिथे ज्याची गरज लागेल ती मदत पुरविणं. चित्राचा एखादा पार्ट रंगव, कटिंग करून ती प्लॅस्टिकमध्ये टाक, 'स्ट्रीट प्ले'वाल्यांची

प्रॅक्टिस घे. त्यांना सुधारणा सुचव आणि काहीच काम नसेल (जे फार कमी वेळा झालं), तर जॉर्ज बुशपासून कॉलेजमधील लफड्यांवर गप्पा ठोक... असं बरंच काही.

आम्ही रविवार पाहत नव्हतो, की रात्र. काम पोस्टर्स बनविणं. मिळतील त्या साधनांनिशी काम चालू ठेवणं. मग असं करत करत जाणवलंच नाही, की १ ऑक्टोबर आला. (चिनी क्रांतीचा साठावा वर्धापनदिन.) त्या दिवशी मग जागा ठरविणं, वेळ आणि इतर डिटेल्सची चर्चा झाली. सर्वांना बेसिक माहिती दिली गेली. महामुनी सरांना भेटून उद्याच्या संदर्भात चर्चा आणि...

बाकी त्या दिवशीचं प्रदर्शन हा आता भूतकाळ आहे. विद्यार्थी, प्राध्यापकांना ते आवडणं, उत्साहवर्धक फीडबॅक इ. बाबी तर काय होतातच...! या सर्व काळात जाणवणारी आणि छळणारी गोष्ट म्हणजे आपल्या लाइफस्टाईलमध्ये नकळतपणे होणारी हिंसा. खूप त्रास दिला आणि अजूनही होतो या जाणिवेमुळे... या प्रदर्शनामुळे किती जण अवेअर झाले? माहीत नाही... सर्व आटपलं आणि दिवसभराच्या ताणाचा कापूर एकदम हलका झाला. रितं रितं मन आणि थकलेली गात्रं. संध्याकाळचे पावणेसहा. पोस्टर्स एका खोलीत बंद. आता परत कधीतरी ती निघतील. धूळ साफ होईल, पण मनं? ती होतील स्वच्छ?

बावीस दिवसांच्या प्रवासात शेवटचे सात तास हा क्लायमॅक्स. 'मोहनदास करमचंद गांधी' नावाचा माणूस अधिक सखोलपणे आणि वेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यासण्याची गरज ही याच दिवसांची मिळकत!

कधीकधी खूप उदास वाटतं. मनात सुन्नता भरून येते. सिनिक व्हायचं नाही असं बजावत आजूबाजूच्या भयाण आणि निराशाजनक वास्तवाकडे सतत नजर खेचली जाते. पण... नैष्कर्म्याचं तत्त्वज्ञान उगाळणारे आम्ही नाही!

'मै जिंदगी का साथ निभाता चला गया', म्हणत पुढची वाटचाल आता करायची आहे. महात्म्याच्या शोधप्रवासात तेवढी हिंमत नक्कीच आली आहे.

**संकल्प गुर्जर**
Mob. 9867238314
sankalp.gurjar@gmail.com

(मुंबईकर असलेला संकल्प गुर्जर, पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात, बी.ए.च्या प्रथम वर्षात शिकत असून, यु.पी.एस.सी.च्या परीक्षेची तयारी आत्तापासूनच करीत आहे.)





विनायक पाचलग

# चेतन भगतला अनावृत पत्र...

युवा अभिव्यक्ती

**चेतन भगतला आजच्या तरुणपिढीचा प्रतिनिधी म्हणून ओळखले जाते. तो आयआयटी आणि आयआयएम या नामांकित संस्थांतून पासआऊट झाला असून, काही काळ सिंगापूर इथे इनव्हेस्टमेंट बँकर होता. त्याची आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली असून, आजही सर्वांत जास्त खपणाऱ्या पुस्तकांत ती आघाडीवर आहेत. अलीकडेच तो नोकरी सोडून भारतात परत आला असून पूर्ण वेळ लिखाणास देत आहे. त्याच्या Five point someone या पुस्तकावर आधारित कथा असलेला 'थ्री इडियट्स' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे.**

हाय चेतन! खरे तर, तुला पत्र लिहिणार नव्हतोच. तुझे पुस्तक आवडले असे सांगणारे एखादे ट्विट टाकणार होतो. तेवढे बास झाले असते. पण मला जे बोलायचं आहे ते १४० अक्षरांमध्ये मावणार नाही, म्हणून हा पत्रप्रपंच. खरे तर बरोबर दोन वर्षांपूर्वी एका लेखातून तुझी मला ओळख झाली, आणि तेव्हापासून आजपर्यंत मी तुझा फॅन होतो, आहे; कदाचित राहीनही! आणि अर्थातच, तुझी सगळी पुस्तकेही वाचलेली आहेत. त्या अनुषंगानेच आज तुझ्याशी बोलणार आहे.

सांगायची गोष्ट अशी, की नुकतेच तुझे चौथे पुस्तक '2 States' वाचले. लग्नाची गोष्ट तू छान सांगितली आहेस. त्यात, स्वत:चीच कहाणी असल्याने नीट एक्स्प्रेस झाली आहे. लोकांना ही कहाणी आवडणार हे नक्की, त्याबद्दल तुझे आधीच अभिनंदन! पण, खरे सांगू, एक पुस्तक म्हणून मला ते अजिबातच आवडले नाही. तुझे हे पुस्तक म्हणजे एका चित्रपटाची पटकथा आहे फक्त! आणि ते बाड तू डायरेक्टरला द्यायच्या आधी आमच्या तोंडावर मारलेले आहेस, इतकेच! अर्थात, त्यावर चित्रपट निघेलच! पण मित्रा, पुस्तकावर चित्रपट निघणे वेगळे आणि चित्रपटाची स्टोरी पुस्तक म्हणून विकणे वेगळे. अगदी प्रसंग, पात्र रचनाही तशीच आहे रे, चित्रपटासारखी... तुला हे माहीत असेलच, की अशा Love story कोपऱ्या कोपऱ्यावर घडतात. पडद्यावर त्या Time pass म्हणून तीन तास बघणे वेगळे; पण वेळ काढून पुस्तकातही तेच वाचण्यात काय अर्थ आहे? चार चित्रपट एकत्र केले, की झाले तुझे पुस्तक. मी अशी स्टोरी लिहिण्याबद्दल म्हणत नाही आहे, ती लिहावीच. पण ती ज्याप्रकारे लिहिलेली आहे, त्यात ज्या प्रकारचा मसाला जाणूनबुजून भरला आहे, ते मला खटकले.

खरेतर, तू आम्हा तरुणाईला आवडलेलास, आवडतोस ते तुझ्या गोष्ट सांगायच्या कौशल्याने; साध्या आणि fuck, suck वाल्या तरुणाईच्या भाषेने, विषयातल्या वेगळेपणामुळे! गेल्या तीन पुस्तकांत तू एकच गोष्ट सांगितलीस. तीन मित्र, एखादा बाबा-बुवा व घडणारा प्रसंग. अगदी 'फाईव्ह पॉइंट समवन'मधला Rhyn असो, कॉल सेंटरच्या स्टोरीमधले लोक असोत; किंवा मग गोविंदची कहाणी. तेच घडले ना तिन्ही कथेत? सगळे जगावेगळे करायला गेले, पण त्यांना जमेना. मग कधी देव आला तर कधी आपलाच आतला आवाज. मग ते सुधारले आणि मग नेहमीप्रमाणे Happy endings. एखादी लव स्टोरी, एखादा ॲडल्ट परिच्छेद. असो. पण आम्ही ती पुस्तके वाचली, डोक्यावर घेतली, आजही ती तिन्ही पुस्तके बेस्टसेलरच्या यादीतून खाली आलेली नाहीत. असे झाले, कारण तू कथेच्या पार्श्वभूमी बदलल्यास; थोडेफार नवे विश्व उलगडवलेस, आम्हांला गुंतवलेस. ते आम्हांला आवडले. पण, खरे सांगू, दर पुस्तकामध्ये तुझी लिखाणाची पातळी घसरत गेली. आता त्या C-word, F-words वाल्या भाषेचेही काही नावीन्य उरलेले नाही. नवीनता हरवली आहे आणि तुझ्या कहाण्यांत जो बदल व्हायला हवा, तोही दिसत नाही. चौथ्या पुस्तकात तर तू फक्त चार चित्रपटांच्या पटकथा एकत्र केल्या आहेस. खरेतर एक Message द्यायचा तू थोडाफार प्रयत्न केला आहेस; पण तो मेसेज अजून तुलाच समजलेला नाही, हे लगेच कळते. मग कशाला हा अट्टहास? चेतन, हे असे का?

यावर तुझं MBA style उत्तर मला मिळेल. ''मी लोकांना जे आवडेल ते देतो. वाचकांची पातळी घसरली, म्हणून मग मीही घसरलो.'' बरोबर आहे, रसिकतेचे अवमूल्यन तर सगळीकडेच झाले आहे. पण चेतन, त्याला बदलायची ताकद तुझ्यात आहे रे. आज 'चेतन भगत' हा एक ब्रँड झाला आहे. मी हे पत्र अरविंद अडिगाला का लिहिले नाही? नाही लिहिणार, कारण अभिरुची बदलायची ताकद तुझ्यात आहे, त्याच्यात नाही! आज 'चेतनचे पुस्तक' लोक आतले मटेरियल न बघता विकत घेतात. एवढा लोकांचा विश्वास तुझ्यावर आहे. मग तू लोकांना बदलवू शकत नाहीस का? तू म्हणतोस, 'मला नव्या भारताचा घटक बनायचे आहे, तो घडवायचा आहे.' मग आपली कथा सांगायची ताकद तू त्यासाठी का वापरत नाहीस? अशाच एखाद्या कहाणीतून तू तुला समजलेला, भावलेला आणि तरुण जनतेला उपयुक्त विचार - भावना लोकांच्या गळी उतरवू शकत नाहीस का? तसा प्रयत्न तू केलास थोडासा. पण त्यातून Message तर गेला नाहीच; पण कथाच कोसळली. तू एखादी चिरंतन कथा सांगू

शकशील का रे? आज आम्ही तुझ्या गोष्टी वाचतो; पण आठवडाभराने त्यातली पात्रेही लक्षात राहत नाहीत. तरुणांना आवडणारे लिखाण म्हणजे 'बुक व्हॅल्यू नसलेले, चार दिवसांत विसरले जाणारे लिखाण', असा समज यामधून होणार नाही का रे? मग तुझी ती स्टोरी आठवायला पुन्हा चित्रपटाला जायचे. (थ्री इडियटस, हॅलो.) आम्ही तुझ्याकडून जरा चांगल्या, मनाच्या कोपऱ्यात कायम टिकून राहील अशा लिखाणाची अपेक्षाच ठेवायची नाही का? एकदा सांग बाबा या प्रश्नाचे उत्तर...

तू चित्रपट लिही रे, जरूर लिही. 200 रुपयांचे तिकीट काढून आम्ही ते पाहू की! पण मनोरंजनाला जीवनात दुय्यम स्थान आहे. ते साधन आहे साध्य नव्हे! तुझ्या स्वत:च्या शैलीत तू या आयुष्यातल्या ध्येयासंबंधी, ते पूर्ण करतानाच्या थराराविषयी, जीवनातल्या निखळ आनंदाविषयी कधी लिहिणार? कॉल सेंटर्सचे कृत्रिम जग किंवा अकल्पित घटनांनी भरलेली 'लव्ह स्टोरी' असेच काहीसे तुझे पुढचे लेखन असणार का? आम्हांला तुझ्याकडून नवे, चांगले वाचायचेय. आजचा तरुण ध्येयहीन झाला आहे. त्याला कसलीच इच्छा नाही. प्रयत्नातला आनंदच तो विसरला आहे. त्यांना हे सगळे कळले पाहिजे आणि ते फक्त तूच सांगू शकतोस! भारतीय राज्यकर्त्यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी ज्या संस्था काढल्या, त्या दोन्ही संस्थांचा तू प्रतिनिधी आहेस. तुला स्वत:ला व्यक्त करायची ताकद आहे, ती इथे वापर ना! पोटापाण्यासाठी चित्रपट लिहिणे वेगळे आणि आपली लेखणी त्यासाठी खर्ची घालवणे वेगळे. या चित्रपटांतून बाहेर ये, काहीतरी Quality, Classic दे! आम्हांला नवी उमेद दे. सांग आम्हांला काहीतरी आणि हे तूच सांगू शकतोस. अगदी साधी साधी गोष्ट तू आमच्या मनात बिंबवू शकतोस, कारण... Young India loves to hear you.

मी तुझा ट्विटरवरचा फॉलोअर आहे. तुला माहिती नसेलही; पण तुझे ट्विट आठवणीने वाचतो. पण MNS वर केलेले sucks, fucks सारखे ट्विट्स् वाचून हळहळतो रे! आमचा हिरो वैचारिकरित्या इतका अस्थिर, अनस्टेबल आहे का? तुझ्या चार पुस्तकांत एक बऱ्यापैकी सारखेपण आहे, ते म्हणजे तुझे सगळे नायक सिस्टीमच्या विरोधात जातात! बरोबर आहे, हा विचार तू देऊ इच्छितोस; पण प्रत्येक जण त्यात हरतो आणि कोणती तरी तिसरी व्यक्ती त्याला मदत करते. आजची पिढी अशी आहे का रे? हे असे चित्र का रंगवायचे? आणि असेल तर बदलायला नको का? तुझे सारे Tweet आणि TOI मधला लेखही भाषिक अस्मितेच्या वादात नव्या पुस्तकाची पोळी भाजून घ्यायचा प्रकार तर नाही? हा पण MBA चा भाग तर नाही ना?

मी खूप बोलतोय, मला माहीत आहे, यातले बरेचसे चुकीचेही असेल! कारण, माझी कुवत कमी असायचीही शक्यता आहे. खरे तर हे सगळे माझ्या अपेक्षाभंगातून आलेले आहे. पत्र लिहिण्याइतकी आत्मियताही कुठून आली ते माहीत नाही. कदाचित मी पण IIT त जायचे स्वप्न पाहतोय, म्हणून आली असेल. मी पण गोंधळलेलो आहे. तुझ्याकडून अशी अपेक्षा



ठेवावी की नाही, माझ्या हिरोला मी असे खडे बोल सुनवावेत का? नाहीतर, अशा Movie style पुस्तकात message शोधत बसावे का? नाहीतर 'असा मेसेज वगैरे काही नसतो, असा दिशा देणारा कोण नसतो, लिखाण फक्त मनोरंजनासाठी असते, निदान तुझे तरी तसे आहे' असे समजायचे का? सांग रे, यंग इंडिया जाऊ देत, निदान I want to hear from my Idol. असो, जास्त बोलत नाही. फक्त एवढेच की,

I am waiting...

तुझा फॅन,


**विनायक पाचलग**

marathilikhan@gmail.com

Mob. 8087216867


(दहावीला ९६ टक्के गुण मिळविणारा विनायक पाचलग, कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयात १२वी सायन्सची परीक्षा देणार असून, आय.आय.टी.ला जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहे.)

युवा अभिव्यक्ती



# गणपत, वुई सॅल्यूट यू...

दीपक जाधव

अवघे दीड वर्षाचे वय असताना झालेल्या अपघातामध्ये उंचावरून पडल्याने 'त्याचे' दोन्ही पाय कायमचे अधू झाले. रांगत-रांगत चालायला शिकण्याचे ते वय, मात्र चालायला शिकण्याच्या आधीच नियतीने त्याचे पायच हिरावून घेतले. पायाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांना इजा पोचल्याने कमरेपासून खालचा भाग निकामी झाला. त्यामुळे संपूर्ण आयुष्यच दुसऱ्यावर अवलंबून राहणार हे निश्चित झाले; पण लहानपणीच आलेल्या या अपंगत्वाने खचून न जाता दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर 'त्याने' जो प्रवास केला तो जितका रोमांचकारी आहे, तितकाच प्रेरणादायी आहे.

गणपत व्यंकट धुमाळे हे माझ्या या मित्राचे नाव. नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातले 'लोणी' हे त्याचे गाव. घरामध्ये तीन भाऊ, दोन बहिणी, आई-वडील असे मोठे कुटुंब. आठ एकर जमिनीमध्ये मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाची गुजराण चाललेली.

गणपतला चालता यावे यासाठी अनेक उपचार करून पाहिले, मात्र वैद्यकशास्त्राने हात टेकल्याने काही होऊ शकले नाही. दोन्ही पायांमध्ये काहीच ताकद नसल्याने 'जयपूर फूट'ही बसविता आले नाहीत.

चुलतभावाच्या पाठुंगळीवर बसून गणपत शाळेला जाऊ लागला. बारावीपर्यंतचे शिक्षण त्याने भावाच्या मदतीने गावातच पूर्ण केले. बारावीमध्ये गणपत कॉलेजमध्ये पहिला आला. मार्क्स चांगले मिळाल्याने त्याने डी.एड.साठी अर्ज केला. त्याप्रमाणे पहिल्याच यादीत त्याचा नंबरही लागला. मात्र अपंगत्व जास्त असल्याने मुलाखतीच्या वेळी त्याला डी.एड.साठी प्रवेश नाकारण्यात आला. गणपतच्या बौद्धिक गुणवत्तेच्या समोर त्याचे शारीरिक अपंगत्व आडवे आले. या घटनेनंतर गणपतचे शिक्षण संपल्यातच जमा होते.

घरचे किराणा मालाचे दुकान सांभाळण्याची जबाबदारी गणपतवर आली. मनामध्ये शिकण्याची, मोठे होण्याची तीव्र आकांक्षा असली, तरी परिस्थितीपुढे त्याला झुकावे लागले होते. एक-दोन वर्षे अशीच गेली. गणपतचा लहान भाऊ उद्धव याने आयटीआयचा कोर्स पूर्ण केल्यानंतर बी.ए. करण्याचे ठरविले. बी.ए. करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी देगलूरला जावे लागणार होते. उद्धव बी.ए. करतो आहे हे ऐकून गणपतलाही आपले मध्येच थांबलेले शिक्षण पुन्हा सुरू करण्याची इच्छा झाली. त्याने घरच्यांकडे तसा हट्ट धरला. घरच्यांना तयार करून उद्धव व गणपत या दोघा बंधूंनी देगलूर महाविद्यालयात बी.ए.साठी प्रवेश घेतला. गणपतच्या आयुष्यातील हा टर्निंग पॉइंट म्हणावा लागेल; कारण यानंतर गणपतने मागे वळून पाहिले नाही. महाविद्यालयात शिकत असताना खंडोजी वाघे आणि बसवंत डुमणे या मित्रांशी त्याची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीमध्ये झाले. चौघांनी मिळून देगलूरमध्ये रूम घेतली व ते एकत्र राहू लागले. महाविद्यालयात शिकत असताना गणपतच्या उपजत गुणांना चांगलेच धुमारे फुटत होते. आपल्या विनम्र आणि गोड स्वभावामुळे धुमाळे बंधूंनी अल्पावधीतच सर्वांना जिंकले होते.

बी.ए. पूर्ण झाल्यानंतर रणखांब सरांच्या मार्गदर्शनानुसार गणपत, उद्धव, बसवंत, खंडोजी या चौघांनी पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात एम.ए. करिता प्रवेश घेतला. काहीतरी वेगळे करायचे या उर्मीनेच ते चौघे पुण्याला आले.

देगलूर महाविद्यालयात शिकत असताना केलेल्या वाचनामुळे त्यांना विविध विचारांची ओळख झाली होती. पुणे विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्यानंतर या विचारांना दिशा मिळण्यास मदत झाली. येथील प्राध्यापक, मित्रमंडळी, अभ्यास वर्ग यामध्ये होणाऱ्या चर्चांमुळे चौघा मित्रांच्या विचारांना प्रगल्भता येण्यास मदत झाली.

रायगड येथे झालेल्या विचारवेध संमेलनामध्ये कॉ. विलास सोनवणे यांच्याशी या चार मित्रांचा परिचय झाला. यावेळी झालेल्या गप्पांमधून 'सजग अभ्यास गटा'ची कल्पना पुढे आली. त्यामध्ये न्यायमूर्ती बी.जी. कोळसेपाटील यांच्या पाषाण येथील घरी आठवड्यातून एक दिवस अभ्यासवर्गासाठी भेटायचे ठरले. विद्यापीठातील विविध विभागांमध्ये शिकणारे अनेक विद्यार्थी या अभ्यासवर्गाच्या निमित्ताने एकत्र जमू लागले. येथे 'मार्क्सवादापासून ते अमेरिकेने इराकवर केलेल्या हल्ल्यापर्यंत' अनेक विषयांवर साधक-बाधक चर्चा होत असे.

गणपतच्या जडण-घडणीमध्ये सजग अभ्यास गटाचा महत्त्वपूर्ण वाटा राहिलेला आहे. एकंदरीतच विद्यापीठातील पुरोगामी विचारांशी गणपतची नाळ जोडली गेली.

घरामध्ये वडील वारकरी असल्याने लहानपणापासून आध्यात्मिक विचारांचा पगडा धुमाळे बंधूंवर होता. कपाळावर गंध, गळ्यात तुळशीची माळ अशा रूपात या बंधूंनी पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला होता. मात्र येथे सजग अभ्यास गटाच्या माध्यमातून पुरोगामी विचारांची ओळख झाल्यानंतर त्यांच्यामध्ये खूप बदल झाला.

मी पुणे विद्यापीठामध्ये राज्यशास्त्र विभागात एम.ए. ला प्रवेश घेतला, तेव्हा गणपत एम.ए.च्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. आम्हांला एक वर्षाने सिनिअर असणारे मित्र सजग अभ्यास गट चालवितात, याची माहिती मिळाल्यानंतर मीही सजग अभ्यास गटाच्या चर्चांमध्ये सहभागी होऊ लागलो. तिथे माझा गणपतशी जवळून परिचय झाला. कोणत्याही चर्चांमध्ये गणपत शांतपणे आपले मत मांडत असे. त्याच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या कायम हास्यावर आम्ही फिदा होतो. त्यामुळे आम्हा सगळ्यांना त्याच्याशी गप्पा मारायला नेहमी आवडत असे.

विविध विषयांतल्या चर्चांबरोबरच आमच्या अभ्यासातल्या अडचणी सोडविण्यासाठीही गणपत नेहमी पुढे असायचा. थिअरीमधल्या अनेक अवघड संकल्पना तो आम्हांला सोप्या मराठीतून समजावून सांगायचा. गणपतने शिकवलेले खूपच चांगल्या रीतीने समजायचे, त्यामुळे प्राध्यापकांचे लेक्चर संपले, की गणपतचा तास त्याच वर्गामध्ये सुरू व्हायचा.

एम.ए. पूर्ण झाल्यानंतर गणपत व उद्धवच्या हॉस्टेलची मुदत संपल्याने, ते दोघे भाऊ माझ्या रूमवर रहायला आले. त्यामुळे त्यांचा आणखीनच निकटचा सहवास लाभला.

एम.ए. नंतर गणपतने राज्यशास्त्र विभागात एम.फिल करिता अर्ज केला होता. अपंगाच्या कोट्यातून गणपत एकमेव विद्यार्थी असल्याने त्याचा एम.फिल. प्रवेश निश्चित होता. मात्र अनपेक्षितपणे राज्यशास्त्र विभागाने त्याला एम.फिल.ला प्रवेश नाकारला. हा निर्णय सर्वांसाठी धक्कादायक होता.



**खंडोजी वाघे या मित्राच्या पाठीवर गणपत धुमाळे**

एम.फिल.ला प्रवेश नाकारण्यात आल्यानंतर गणपतने उमेद खचू न देता, विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिटयूटमधील पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमात प्रवेश मिळवला. त्याच वेळी खंडोजी वाघे, संदीप मराठे आणि मलाही पत्रकारिता अभ्यासक्रमास प्रवेश मिळाल्याने आमचा छान ग्रूप तयार झाला. उद्धवला काही कारणास्तव बाहेरगावी जावे लागल्याने खंडोजी गणपतला विद्यापीठातून रानडे इन्स्टिटयूटपर्यंत सायकलवर डबलसीट घेऊन येत असे. एकदा 'लोकसत्ता'चे ज्येष्ठ उपसंपादक डी.आर. कुलकर्णी यांनी हे पाहिल्यानंतर, त्यांनी गणपतची सर्व माहिती जाणून घेऊन लोकसत्तामध्ये प्रसिद्ध केली. ती बातमी वाचून काही सुहृदांनी गणपतला तीन चाकी ॲक्टिव्हा गाडी घेऊन दिली. याकरिता डी.आर. कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला. पुढे दै. 'सकाळ'ने गणपतचा 'सामान्यातील असामान्य' हा पुरस्कार देऊन गौरव केला. विद्यापीठातील मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी गणपतवर 'पाऊलवाट' ही डॉक्युमेंटरी/फिल्म बनवली. दरम्यानच्या काळात 'सामना', 'लोकमत' या वृत्तपत्रांमधूनही गणपतविषयी छापून आले. अपंगत्वावर प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मात करून गणपतने केलेल्या वाटचालीची चांगली दखल पुण्यातील प्रसारमाध्यमांनी घेतली.

पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर गणपतला दै. 'पुढारी'मध्ये ट्रेनी उपसंपादक म्हणून नोकरी मिळाली. नंतर 'युनिक ॲकॅडमी'मध्येही गणपत काम करू लागला. युनिक ॲकॅडमीमध्ये ११ ते ५ अशी पूर्णवेळ नोकरी व त्यानंतर 'पुढारी'मध्ये ६ ते रात्री १२ अशी अर्धवेळ नोकरी त्याने काही दिवस केली.

या व्यस्त दिनक्रमामधून अभ्यास करत गणपतने 'सेट'ची परीक्षा दिली. अत्यंत कमी निकाल लागणाऱ्या सेटच्या परीक्षेत राज्यशास्त्र विषयामधून तो उत्तीर्णही झाला. गणपतच्या सेट उत्तीर्ण होण्याने एम.फिल.ला प्रवेश नाकारणाऱ्यांना सणसणीत चपराक बसली.

शैक्षणिक पातळीवरील गणपतच्या यशस्वी कामगिरी बरोबरच त्याची सामाजिक बांधिलकीही लक्षणीय आहे. सजग अभ्यास गटामुळे त्याची स्पष्ट वैचारिक बैठक तयार होण्यास मदत झाली होती. तेथे स्वीकारलेले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी गणपत सध्या राष्ट्रीय पातळीवरील 'युवा भारत' या संघटनेच्या माध्यमातून काम करीत आहे. युवा भारत ही देशभरातील विविध प्रश्नांवर लढे उभारणारी संघटना आहे. डाऊ प्रकल्पाच्या विरोधातील आंदोलन, उजनी जलाशयातील परप्रांतीय मच्छीमारांच्या विरोधातील आंदोलन, मीरा-भाईंदरमधील कचरा डेपोच्या विरोधातील आंदोलने ही या संघटनेने महाराष्ट्रात उभारलेली प्रमुख आंदोलने आहेत. या संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'सकल' या नियतकालिकाची जबाबदारी सध्या गणपत सांभाळत आहे. संधीअभावी खितपत पडलेल्या अपंगांना न्याय मिळवून देण्यासाठी 'युवा भारत'च्या माध्यमातून प्रयत्न करण्याची गणपतची इच्छा आहे.

महाविद्यालयात नोकरी मिळविण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागण्याच्या काळात जळगावच्या 'एम.जे. लॉ कॉलेज'ने एक रुपयाही न घेता, केवळ गुणवत्तेच्या आधारावर गणपतला नोकरी दिली आहे. नुकताच (डिसेंबर महिन्यात) तो नोकरीवर रुजूही झाला आहे. ज्याला अपंगत्वाचे कारण पुढे करून डी.एड.ला प्रवेश देण्यासही नकार देण्यात आला होता, तोच गणपत आता उद्याच्या वकिलांना राज्यशास्त्र शिकवू लागला आहे.

अनेक लोक धडधाकट शरीर, सर्व सुखसुविधा मिळाल्या असतानाही व्यवस्थेच्या वा परिस्थितीच्या नावाने बोटे मोडत असतात. पण प्रतिकूल परिस्थितीलाही झुकवून यशस्वी होता येते, हे गणपतने दाखवून दिले आहे.

गणपत, वुई सॅल्यूट यू.


**दीपक जाधव**
Mob. 9822312309
deepak.jadhav@gmail.com


(पुणे विद्यापीठातून एम.ए. राज्यशास्त्र झालेला सोलापूर येथील दीपक जाधव, सध्या दै. 'लोकमत'च्या पुणे आवृत्तीसाठी पत्रकार म्हणून काम करीत आहे.)



प्रसन्न जोशी

# ब्लॉगिंग, तरुणाई आणि मराठी

युवा अभिव्यक्ती

**मार्च महिन्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे होत आहे. 'पुण्यात जे निर्मित होते ते जगात प्रचलित होते' असे म्हणतात. नव्या संमेलनाध्यक्षांनी जर त्यांच्या अध्यक्षीय भाषणात ब्लॉग माध्यमाबाबतीत काही आवाहन केले, तर त्याला मोठा प्रतिसाद मिळेल. किंबहुना, त्यांनी आधी स्वत: आपला ब्लॉग सुरू करून 'ब्लॉग असणारे पहिले संमेलनाध्यक्ष' ही मुहूर्तमेढ रोवावी. यासाठी हवी ती मदत करण्यास आम्ही ब्लॉगर्स पुढे येऊ.**

जाहीरनामा, भुंगा, अब्द, अक्षरधूळ, नेटभेट. ही नावं ना कुठल्या पुस्तकांची आहेत, ना शब्दकोड्यातल्या उभ्या- आडव्या रकान्यांकरिताच्या पर्यायांची. ही नावं ब्लॉग्जची आहेत. ब्लॉग्जबद्दल आपण कुठे- कुठे, काही- काही वाचलं असेलच. सध्या तर वृत्तपत्रंही ब्लॉग्ज चालवतात. इंटरनेटवरील ब्लॉग्जची दखल घेतात. त्यांच्या बातम्याही देतात. वृत्तवाहिन्याही आपल्या संकेतस्थळावर स्वत:चे आणि वाचकांच्या मतप्रदर्शनासाठीचे ब्लॉग्ज चालवितात. अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीत ओबामा ब्लॉग्जचा वापर प्रचारासाठी करतात. अमिताभ बच्चन, अमीर खान यांच्या ब्लॉग्जवरच्या लिखाणाच्या बातम्याही होतात; पण म्हणून ब्लॉग म्हणजे काहीतरी फॅशन, मिरवायची गोष्ट नाही. ज्याप्रमाणे कधीकाळी उगाचंच उघडलं जाणारं ई-मेल अकाउंट आज गरज बनलंय, तसंच ब्लॉगचंही आहे. संपर्कासाठी ई-मेल आणि अभिव्यक्तीसाठी ब्लॉग किंवा वेबसाईट हे भविष्य आहे. हे ब्लॉगमाध्यम सध्या आपला दहावा वाढदिवस साजरा करतंय.

**ब्लॉग म्हणजे काय?**

ब्लॉग म्हणजे वेबसाईटच. ज्याप्रमाणे www.weeklysadhana.com ही वेबसाईटची लिंक आहे, त्याप्रमाणेच www.quintessential.blogspot.com अशी ब्लॉगची लिंक असते. पण ब्लॉग जरी वेबसाईट स्वरूपाचा असला तरी वेबसाईट ही ब्लॉग असतेच असे नाही. उलट ब्लॉग हा वेबसाईटमधला एक घटक असू शकतो. वेबसाईट तयार करणं हा तसा खर्चिक प्रकार असतो. डोमेन नेम (वेबसाईटचा पत्ता) नोंदवणं, वेबसाईट डिझाईन करणं याला खर्च येतो. उलट तुम्ही तुमचा ब्लॉग विनामूल्य तयार करू शकता. Blogger, wordpress, blog अशा अनेक वेबसाईट तुम्हांला विनामोबदला ब्लॉग देऊ शकतात. वेबसाईट हे प्रामुख्याने समूहाचं, सामूहिक माध्यम असतं. ब्लॉग मात्र वैयक्तिक माध्यम म्हणून लोकप्रिय आहे. आज जरी 'ब्लॉग' हा शब्द वापरला जात असला तरी, प्रामुख्याने वेबवरील ब्लॉग (म्हणजेच नोंदी) या अर्थानं जॉन बर्जर यांनी 'वेबलॉग' हा शब्द १९९७ मध्ये वापरला. पुढे (१९९९) सॉफ्टवेअर तंत्रज्ञ पीटर मरहोल्ज यांनी 'ब्लॉग' हा सुटसुटीत शब्द दिला.

**ब्लॉगचं महत्त्व**

आज जगभरात जी बहुमाध्यमं आहेत (Mass Media), ती जरी लोकांसाठी असली आणि लोकांबाबत असली तरी त्यांत लोकांना थेट सहभाग कमी प्रमाणात मिळतो. अगदी तुम्ही पुस्तक लिहिलं, जाहिरात दिली, भाषण केलं तरी तुम्ही काही वेळेपुरतं काही लोकांपर्यंतच पोहोचू शकता; पण ब्लॉगचं तसं नाहीए. ब्लॉग कुणीही, कुठेही, कधीही प्रसिद्ध करू शकतो आणि तो कुणीही, कधीही, कुठेही वाचू शकतो. (तुम्ही जर ब्लॉगवर व्हिडिओ- ऑडिओ क्लिप, फोटो टाकले तर या वाक्यात 'पाहू' आणि 'ऐकू' हे शब्दसुद्धा समाविष्ट होतील.) अशा या शक्तिवान माध्यमाचा वापर करून साध्या साध्या लोकांनी वृत्तपत्रांना, कंपन्यांना घाम फोडला. अमेरिकेची अध्यक्षपदाची निवडणूक तर ब्लॉग्जवरही लढली गेली असं म्हणतात. www.blogcatalog.com या वेबसाईटवर ब्लॉगच्या माध्यमातून चाललेल्या चळवळींची माहिती मिळू शकते. सध्या जगभरात १ कोटी लाख ब्लॉग्ज असल्याचा अंदाज आहे (संदर्भ : technorati.com), भारतात १० लाखांपेक्षा अधिक ब्लॉगर्स असून, यांत तरुणांची संख्या (१५ ते ४५ वर्षे) ६० टक्क्यांहून अधिक आहे. (संदर्भ : MSN LIVE सर्व्हे).

**मराठी, ब्लॉग आणि युवक**

मराठीची गळचेपी, मराठी भाषेची दुरवस्था हा महाराष्ट्र राज्य निर्मितीपासून चर्चेत असणारा विषय आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, साहित्यनिर्मिती आणि प्रसारासाठी भाषा संवर्धन महामंडळ, साहित्य परिषद, विश्वकोष मंडळ असे अनेक उपक्रम सुरू आहेत. आज अर्धा डझन मनोरंजन वाहिन्या आणि तितक्याच वृत्तवाहिन्याही मराठीत आहेत. अनेक साप्ताहिकं, मासिकं, दैनिकं, दिवाळी अंक यांची रेलचेल आहे. पण त्यांच्या वाढीला, आवाक्याला मर्यादा आहेत. कुठल्याही भाषेचं संवर्धन हे त्या भाषेच्या लिहिण्यात, बोलण्यात, वाचण्यात, ऐकण्यात अशा सर्व बाजूंनी, सर्व विषयांत आणि महत्त्वाचं म्हणजे सर्वांकडून वापर होण्यावर अवलंबून असतं आणि हेच काम ब्लॉग करू शकतो. एखादा मराठी ब्लॉग ज्याप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील कुणी तयार

करू शकतो, तसाच वॉशिंग्टनमध्येही एखादा महाराष्ट्रावर प्रेम करणारा करू शकतो. जरा विचार करा... धम्मचक्र प्रवर्तनाच्या दिवशी नागपूरमधल्या दीक्षा भूमीवरचा अनुभव ते अगदी कोपनहेगनमधल्या वातावरणविषयक परिषदेचा वृत्तांत, शेअरबाजाराची मराठीत माहिती, औरंगाबाद जवळच्या अजिंठा लेण्यांविषयी सचित्र लेखन, खवैय्यागिरीची ठिकाणं, विविध भाषांमधील लेखांचा अनुवाद, आपलेच स्वैर अनुभव, फोटो, कार्यक्रमाचं शूटींग असं सगळं तुम्हांला लिहिता, अनुभवता येतं. आपल्याच भाषेत! कुठेही आणि कधीही! आज मराठीत सुमारे दहा हजार कार्यरत ब्लॉग्ज आहेत. www.marathiblogs.net या वेबसाईटवर मराठी ब्लॉग्जची यादी आहे. ब्लॉग कसा तयार करावा व मराठीत लेखन, ब्लॉगची आकर्षकता वाढवणं, ब्लॉगर्सशी संपर्क यांसाठी ही वेबसाईट तुम्हांला मदत करू शकते.

**मराठी ब्लॉगोस्फिअरची स्थिती**

जसं Atmosphere तसंच Blogosphere! चांगली गोष्ट ही आहे, की मराठी ब्लॉगर्समध्ये तरुणांची संख्या मोठी आहे; पण प्रॉब्लेम आहे तो सकस विषयांवरच्या लेखनाचा (लेखन, फोटो, व्हिडिओ, ऑडिओ) दुष्काळ, ब्लॉग लिहिण्यातली अनियमितता; याशिवाय मराठीत लिहिण्याच्या अडचणी, इंटरनेटची सुविधा दर्जेदार नसणं (विशेषत: ग्रामीण भागात) या काही अस्सल अडचणीही आहेतच. ‘स्टार माझा’च्या ‘ब्लॉग माझा’ या स्पर्धेसाठी काम करीत असताना, मला मोठ्या प्रमाणात स्वान्तसुखाय ब्लॉग्ज आढळले. साहित्याबद्दल चर्चा करणारे ब्लॉग्जही अपवाद वगळता, पु.ल., जी.ए., ऐतिहासिक कादंबऱ्या, लोकप्रिय कविता यांपुढे जात नाहीत. अर्थात चालू घडामोडी, पर्यटन, ज्योतिष, शास्त्र, संगीत, कला, तंत्रज्ञान यांना वाहिलेले उत्तम ब्लॉगही खूप आहेत. एक जाणवलं; ग्रामीण असो की शहरी लेखनाची शैली, त्यातली ओढ उत्तम आणि अस्सल आहे. गरज आहे ती चांगल्या ब्लॉगर्सना प्रकाशात आणण्याची, तसंच ब्लॉगर्सना एकत्र आणून नियमित संवाद साधण्याची. यातून भविष्यातले लेखक, साहित्यिक तयार होतील अशी आशा आहे. पुण्यात असा प्रयत्न ‘माध्यमाईट्स’ या माध्यम क्षेत्रातील, आम्ही काही तरुणांच्या ग्रुपनं केला आहे व पुढेही करायची इच्छा आहे. मी इथे मराठी ब्लॉगच्या लिंक्स मुद्दाम देत नाहीए; कारण, तुम्ही मराठी ब्लॉग्ज नेट वेबसाईटवर जाऊन ते ब्लॉग्ज पाहावेत, अशी अपेक्षा आहे. (गुगल ब्लॉगसर्चमार्फत तुम्ही दर्जेदार इंग्रजी ब्लॉग्ज पाहू शकता.)

**ब्लॉगिंगचे फायदे**

तुम्ही ब्लॉगिंग मराठीत करा किंवा अन्य कुठल्याही भाषेत, तुम्हांला स्वत:ला ओळख मिळाल्याचा आनंद गवसेल. तुमच्या लेखनाला जेव्हा कुणी दाद देतं, तो आनंदच न्यारा, ज्या विषयावर तुम्ही लिहीत जाता, तसतसा तुमचा फोकस स्पष्ट होत जातो. तुमचं भाषेवरील प्रभुत्व वाढतं. तुमच्या ब्लॉगचा वापर तुम्ही स्वत:च्या प्रसिद्धीसाठी, बायोडेटा म्हणूनही करू शकता. ब्लॉगच्या माध्यमातून अर्थार्जनही शक्य आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मंडळींनी ब्लॉगवर लेखन केल्यास, ते ज्ञान सर्वांना उपलब्ध होऊ शकतं. विशिष्ट विषयावरील ब्लॉगर्स एकत्र येऊन चळवळ उभारू शकतात. एकेकाळी मराठीत अनियतकालिकांची चळवळ गाजली. आज ब्लॉगच्या माध्यमातून दर्जेदार ई-नियतकालिकं विनाखर्च तयार होऊ शकतील. लोकचळवळींनाही ब्लॉग हे सशक्त माध्यम म्हणून उपलब्ध आहे. हे सर्व मराठीत झाल्यास आपली मराठी भाषा समृद्ध होईल, हे नक्की.

**ब्लॉगरची जबाबदारी**

एवढं ताकदवान माध्यम हाती येतंय, म्हटल्यावर जबाबदारीही आहेच. काही जबाबदारी नैतिक आहे तर काही कायदेशीर. ब्लॉगवरील मजकूर स्वत:चा असावा, अन्य संदर्भ घेतला असल्यास स्रोताचा उल्लेख करावा. बदनामीकारक मजकूर असू नये. ब्लॉग हे सार्वजनिक माध्यम आहे, याचं भान असावं. नियमित ब्लॉगिंग करावे. वैयक्तिक ब्लॉग असावाच; पण एखाद्या सामाजिक कार्यासाठीही ब्लॉग सुरू करावा. उदा. गावाकडील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थी-शिक्षक मराठी ब्लॉगच्या माध्यमातून नोट्स देऊ शकतील. भाषांतराची जबाबदारी कुणी स्वीकारल्यास उत्तमोत्तम लेखन आपल्या भाषेत ब्लॉगवर येईल. आपल्या शहराची ताजी आणि सूक्ष्म माहिती देणारा ब्लॉग सर्वांनाच उपयोगी ठरेल.

**यांना आवाहन :**

‘साधना’ने हा लेख लिहिण्याची दिलेली संधी साधून साहित्यिक, संस्था, नियतकालिकं, मान्यवर, चळवळी यांना एक आवाहन करायचंय. आपण कृपया ब्लॉगचा नियमित वापर सुरू करा. तुम्ही तो केल्यानं बाकीचेही ब्लॉगिंग करतील. विशेषत: मराठी वाचक वाढण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांनीच ब्लॉगिंग केले पाहिजे आणि ब्लॉगचा प्रसार केला पाहिजे. यात तोटा कुठलाही नाही. साहित्यविषयक संस्था, व्यक्तींनी तर यात पुढाकार घ्यायला हवा. मराठीतील मान्यवर लेखक, साहित्यिक, कवी, कलाकार, उद्योजक, व्यावसायिक, तंत्रज्ञ, कार्यकर्ते, राजकारणी यांचे ब्लॉग्ज अभावानेच आहेत. ते मोठ्या प्रमाणात सुरू होण्याची गरज आहे. मार्च महिन्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे होत आहे. पुण्यात जे निर्मित होतं ते जगात प्रचलित होतं असं म्हणतात. नव्या संमेलनाध्यक्षांनी जर त्यांच्या अध्यक्षीय भाषणात ब्लॉग माध्यमाबाबतीत काही आवाहन केलं तर त्याला मोठा प्रतिसाद मिळेल. किंबहुना, त्यांनी आधी स्वत: आपला ब्लॉग सुरू करून ‘ब्लॉग असणारे पहिले संमेलनाध्यक्ष’ ही मुहूर्तमेढ रोवावी. यासाठी हवी ती मदत करण्यास आम्ही ब्लॉगर्स पुढे येऊ.

**प्रसन्न जोशी**
Mob. : 8108407578
prasann.joshi@gmail.com

(पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभागातून शिक्षण पूर्ण केल्यावर प्रसन्न जोशीने काही काळ वृत्तपत्रात काम केले, सध्या तो मुंबई येथे ‘स्टार माझा’वर असिस्टंट प्रोड्यूसर आहे.)

युवा अभिव्यक्ती



# त्या बैठकीनंतर मनात आलेले काही विचार

**हमीद दाभोलकर**

**सध्याच्या विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये प्रत्येक तरुणाला स्वत:च्या कुटुंबाचा भार स्वत:च्या खांद्यावर वाहावा लागतो. अशा वेळी असीम त्यागाची भाषा व्यवहार्य वाटत नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ता बनण्याचे पूर्वीच्या जमान्यातील 'मॉडेल' बदलण्याची वेळ आली आहे का, हे पण तपासून बघितले पाहिजे. ठराविक लोकांच्या अमर्याद त्यागापेक्षा अनेक जणांच्या थोड्या-थोड्या त्यागावर निर्माण झालेले सामाजिक कामाचे मॉडेल, आजच्या तरुणाईला जवळचे वाटण्याची अधिक शक्यता आहे.**

मागच्या महिन्यात सातारा जिल्ह्यातील परिवर्तनवादी लोकांची एक बैठक झाली. मी स्वत: हजेरी लावलेली अशा स्वरूपाची ही तिसरी/चौथी बैठक असेल. मला कळायला लागले तेव्हापासून दर सहा महिन्यांतून अथवा वर्षातून अशी एखादी तरी बैठक महाराष्ट्रात कुठे ना कुठे होतच असते. 'बहुतांश बैठकींमध्ये तेच तेच चेहरे आणि तेच तेच विषय' अशी या बैठकींविषयी माझ्या मनात प्रतिमा निर्माण झाली आहे. साताऱ्यामधील ही बैठकदेखील त्याला अपवाद नव्हती.

तरुण वर्ग कोणत्याही परिवर्तनवादी चळवळीचा कणा समजला जातो. या वर्गाचे प्रतिनिधी म्हणावेत असे आम्ही दोन-चारच तरुण ह्या बैठकीला हजर होतो. अशा बैठकीतून बाहेर पडताना मानसिकता कशी भारावलेली आणि जोशपूर्ण पाहिजे; पण खरे सांगायचे तर त्या बैठकीतून बाहेर पडताना माझे मन एका कंटाळवाण्या भावनेने भरलेले होते. मी विचार करू लागलो, 'माझी कौटुंबिक पार्श्वभूमी समाजपरिवर्तनाच्या चळवळीशी निगडित असताना आणि मला स्वत:ला अशा कामाशी जोडून घेण्याची प्रामाणिक इच्छा असताना, हे असे का व्हावे?' माझ्या मनात बैठकीतून बाहेर पडताना असाही एक विचार चमकून गेला, की 'मलाच जर हे कंटाळवाणे वाटत असेल तर इतर तरुणाईचे काय?' मग मला जाणवले, 'समाजपरिवर्तनाच्या चळवळींकडून आजच्या तरुणाईबद्दलच्या आकलनात काहीतरी मोठी गफलत होते आहे.'

आजचा तरुणवर्ग नक्की कसा आहे आणि आपल्या आजुबाजूच्या समाजवास्तवाकडे तो कोणत्या नजरेने बघतो, हे अधिक सजगपणे समजून घेणे, सर्वच परिवर्तनवादी चळवळींच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे. त्या अंगाने चर्चेला तोंड फुटावे म्हणून काही मुद्दे मांडणे हा ह्या लेखाचा उद्देश आहे.

आजच्या तरुणाईचा खरा प्रतिनिधी कोण, हे ठरवणे नक्कीच सोपे नाही. बाईकवरून फिरणारा, मॉल्समध्ये खरेदी करणारा, मल्टिप्लेक्समध्ये सिनेमा बघणारा आणि परदेशी नोकरीची संधी शोधणारा शहरी तरुण?... की ज्याची पहिली पिढी कॉलेजची पायरी चढते आहे, शिकून आर्थिकदृष्ट्या स्थिरस्थावर होण्याचे ज्याचे स्वप्न आहे; पण स्वत:च्या गावाशी असलेली त्याची नाळ अजून तुटलेली नाही, असा ग्रामीण-निमशहरी तरुण? राजकीय पुढाऱ्यांच्या पुढेमागे करणारा, रस्त्यावर राडे करायला उतरणारा आणि कशाशीही बांधिलकी न मानणारा तरुणवर्ग?... की टोकाच्या प्रांतिक अथवा धार्मिक आयडेंटिटीपासून जो दूर आहे, स्वत:चे स्थिरस्थावर आयुष्य ज्याला हवे आहे; पण तरीदेखील ज्याला प्रामाणिकपणे स्वत:पलीकडे बघण्याची इच्छा आहे असा तरुण? ह्यांतील एकच समूह आजच्या तरुणाईचा प्रतिनिधी म्हणून सांगणे अवघड आहे आणि अयोग्यदेखील.

असे असले, तरी आजच्या तरुणाईची स्वत:ची काही लक्षणे निश्चितच आहेत आणि त्यांतील पहिले आणि महत्त्वाचे लक्षण म्हणजे त्यांना पडलेले सुखी मध्यमवर्गीय आयुष्याचे स्वप्न! भले, मग तो तरुण शहरी असो अथवा ग्रामीण, त्याच्या एक गोष्ट पक्की लक्षात आली आहे, की 'आपण जर पुरेसे कष्ट केले आणि आपल्या बुद्धीला थोडाफार ताण दिला, तर आपण निश्चितच ह्या देशातील सुखी मध्यमवर्गात जाऊ शकतो. ह्यासाठी कोणतीही व्यवस्था बदलायची गरज नाही. फक्त येनकेनप्रकारेण आपण स्वत: तिथे पोहोचले म्हणजे झाले.' त्यामुळेच 'जग बदल घालूनी घाव' किंवा 'आता उठवू सारे रान' ह्याची त्याला गरज नाही. वर्गसंघर्षाची आणि वर्णसंघर्षाची भाषा त्याच्यापासून कोसो दूर आहे. हे योग्य की अयोग्य, ते जरा बाजूला ठेवू; पण ज्या विचारांना धरून ह्या समाजातील एक पिढी समाजपरिवर्तनाच्या चळवळीत उतरली, तो विचार, ती भाषा आजच्या तरुणाईची नाही, हे कटू असले तरी वास्तव आहे!

आजच्या तरुणाईचे दुसरे महत्त्वाचे लक्षण म्हणजे ती 'प्रॅक्टिकल' आहे. तत्त्वसैद्धांतिक गप्पांपेक्षा त्यांचे व्यवहारातील वर्तनाकडे जास्त लक्ष आहे. त्यामुळे तात्कालिक प्रश्न प्रभावीपणे सोडविण्याची क्षमता असलेला बराक ओबामा, अथवा तसे स्वप्न दाखविणारा राज ठाकरे त्यांना जवळचा वाटतो.

'आक्रमकता' हा तारुण्याचा स्थायीभाव आहे. त्यामुळे 'आजचा तरुण आक्रमक आहे', ह्यामध्ये फारसे काही नवल नाही. त्याच्या आक्रमकतेला विधायक वळण देणारे अवकाशच

उपलब्ध नसल्याने, तो स्वाभाविकपणे प्रांतीयतेकडे आणि धार्मिकतेकडे वळताना दिसत आहे.

आजच्या तरुणाईचे थोडेसे वेगळे, तरी देखील अत्यंत महत्त्वाचे लक्षण म्हणजे 'आधुनिक तंत्रज्ञानाविषयीचे प्रचंड आकर्षण'. इंटरनेट, मोबाईल, चॅटिंग, ब्लॉग हे सगळे त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाले आहेत. तंत्रज्ञानाचे अमर्याद फायदे ते उपभोगत आहेत; त्यामुळे तंत्रज्ञानाला विरोध करणारी भाषा त्यांना आपली वाटत नाही.

आजच्या तरुणाईची भाषा समजण्यासाठी आमच्या काळाचा संदर्भ देखील समजून घेणे आवश्यक आहे. ऐंशी-नव्वदच्या दशकात जन्मलेले आम्ही सगळे तरुण, जागतिक रंगमंचावरील अत्यंत वेगवान घटनाक्रमांचे साक्षीदार आहोत. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या क्रांतीने संपूर्ण जगाचे संदर्भच बदलून टाकले आहेत. गेली अनेक शतके ज्या गोष्टी मानवाला अशक्य वाटत होत्या, त्या आता कॉम्प्युटरच्या एका क्लिकमध्ये होऊ लागल्या आहेत. जगभरात झपाट्याने घडून आलेल्या जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या प्रक्रियेने सर्व आसमंत व्यापून टाकलेला आहे. मानवाच्या अस्तित्वालाच धोकादायक ठरू शकणारा मूलतत्ववाद आणि दहशतवाद यांचा वाढता प्रभाव, ग्लोबल वॉर्मिंगसारख्या नैसर्गिक आपत्तींची टांगती तलवार यांचा एक मोठा संदर्भ आमच्या कालखंडाला आहे. एखाद्या संपूर्ण पिढीवर गारुड टाकणाऱ्या प्रभावशाली सामाजिक नेतृत्वाचा अभाव, हा देखील आमच्या कालखंडाचा एक महत्त्वाचा संदर्भ! भारताच्याच काय पण जगाच्या रंगमंचावरदेखील ज्याच्यामागे ध्येयधुंद होऊन जावे, असे नेतृत्व गेल्या दोन-तीन दशकांत झालेले नाही. एका बाजूला अतिशय झपाट्याने बदल घडून येणारा आणि आकलनास अवघड असा कालखंड आणि दुसऱ्या बाजूला आयुष्याला दिशादर्शक ठरणाऱ्या तत्त्वप्रणाली व नेतृत्वाचा अभाव, अशी कोंडी आजच्या तरुण पिढीची आहे.

समाजपरिवर्तनाच्या ज्या चळवळी आम्ही बघितल्या, अथवा ज्यांच्याविषयी वाचले/ऐकले, त्यांचा एक मोठा नकारार्थी ठसा आमच्या मनावर आहे. २५ ते ३५ वर्षे वयोगटातील तरुणांना हे विधान अधिक लागू आहे. नीतीच्या आणि न्यायाच्या प्रश्नावर चळवळ करणारे डावे पक्ष, प्रत्यक्षात मात्र वैयक्तिक स्वार्थासाठी आणि सत्तेसाठी भांडताना आणि असंख्यवेळा फुटताना आम्ही पाहिले. बहुजनांच्या सामाजिक न्यायासाठी उभी राहिलेली आंदोलने भ्रष्ट होताना आम्ही पाहिली. रिपब्लिकन पक्षाचे हास्यास्पद होणेदेखील आम्ही पाहिले. कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या न्यायासाठी चालविल्या गेलेल्या चळवळी आणि त्यांचे नेते कसे भ्रष्ट आणि संदर्भहीन झाले, ते देखील आम्ही पाहिले. मग समाजपरिवर्तनाच्या चळवळींपासून आजचा तरुण अलिप्त रहात असेल तर त्याला निष्क्रियता म्हणावी की व्यावहारिक शहाणपण, ह्या प्रश्नाचे उत्तर निश्चितच सोपे नाही!

समाजपरिवर्तनाच्या चळवळींनी कार्यकर्त्यांकडून कायमच असीम त्यागाची मागणी केली. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये घरातील एका मुलाने समाजकार्याला वाहून घेणे शक्य होते. कुटुंबातील इतर सदस्य त्याच्या प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडू शकत होते. सध्याच्या विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये प्रत्येक तरुणाला स्वत:च्या कुटुंबाचा भार स्वत:च्या खांद्यावर वाहावा लागतो. अशा वेळी असीम त्यागाची भाषा व्यवहार्य वाटत नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ता बनण्याचे पूर्वीच्या जमान्यातील 'मॉडेल' बदलण्याची वेळ आली आहे का, हे पण तपासून बघितले पाहिजे. ठराविक लोकांच्या अमर्याद त्यागापेक्षा अनेक जणांच्या थोड्या-थोड्या त्यागावर निर्माण झालेले सामाजिक कामाचे मॉडेल, आजच्या तरुणाईला जवळचे वाटण्याची अधिक शक्यता आहे.

वरील पार्श्वभूमीवर आजच्या तरुणाईचे सुप्तावस्थेत असणे, हे सकारात्मक पद्धतीने देखील बघता येऊ शकते. समाजपरिवर्तनाच्या तत्त्वज्ञानामध्ये आणि काम करण्याच्या पद्धतींमध्ये बदलाची आत्यंतिक गरज असलेला हा कालखंड आहे. समाजाला नवी दिशा देणाऱ्या सर्जक अशा नवचिंतनाची आज गरज आहे. अशा वेळी तरुणाईच्या वर्तनापेक्षा तारुण्याच्या अर्थावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. वैयक्तिक पातळीवर पालकांपासून म्हणजेच सामाजिक पातळीवर आपल्या पूर्वसुरींपासून स्वत:चे वेगळेपण प्रस्थापित करणे, हाच तारुण्याचा सगळ्यांत महत्त्वाचा अर्थ! ह्या पातळीवर कोणत्याही पिढीतील तरुणाई एकमेकांपासून वेगळी असूच शकत नाही.

तारुण्याच्या ह्या अर्थावर आपण विश्वास ठेवला, तर प्रश्न तुलनेने सोपे होतील. आजच्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीला स्वत:ची भूमिका जरा बदलावी लागेल. तरुणांशी संवाद करण्यासाठी त्यांना पुढाकार घ्यावा लागेल, आणि मोठ्या मनाने आजच्या तरुणाईचे भावविश्व समजून घ्यावे लागेल. त्यांना स्वत:चे नवचिंतन करण्यासाठीचे अवकाश उपलब्ध करून देणे, हे समाजपरिवर्तनाच्या चळवळींसमोरचे मोठे आव्हान आहे. असीम त्याग न करता सुद्धा चळवळींशी तरुणाईला जोडून घेता येईल अशा जागादेखील निर्माण कराव्या लागतील, आणि ह्या सगळ्याला वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात नैतिकतेने वागण्याच्या निर्धाराची जोड द्यावी लागेल. हे सगळे करण्यात आपण कमी पडलो, तर नक्कीच आजचा तरुण एकतर आक्रमक धर्मवाद/जातवाद/प्रांतवादाचा समर्थक बनेल; किंवा स्वयंमग्नतेच्या वाटेने चालू लागेल; आणि आपण मात्र समाजपरिवर्तनाची चळवळ प्रभावहीन का होत आहे, ह्याविषयी निरस बैठका परत परत घेत राहू.

**हमीद दाभोलकर**
१९ गुरुकृपा कॉलनी, गोडोली, सातारा.
Mob. 9823557531
hamid.dabholkar@gmail.com

(कराड येथून एम.बी.बी.एस. आणि पुणे येथून एम.डी. (सायकियॅट्रिस्ट) झालेला हमीद दाभोलकर सातारा येथे 'मानसोपचारतज्ज्ञ' म्हणून काम करीत आहे आणि 'विवेकवाहिनी' या तरुणांच्या संघटनेतही कार्यरत आहे.)



अशोक पवार

युवा अभिव्यक्ती

# पण या कवितेवर कविताच लिहिता येत नाही...!

**आता त्या हायवेने गेलो, की मला ते दोन झेंडे दिसतात. कविता माझ्या काळजावर घाव घालून जाते. मला उभा फाडून टाकते. मी तिला विसरण्याचा प्रयत्न करतो; पण ती विसरत नाही. अशा अस्वस्थ घटनांवर मी छोट्यामोठ्या कविता लिहितो. आतापर्यंत खूप कविता लिहिल्या... या कवितेवरही कविता लिहिण्याचा खूप प्रयत्न केला; पण जमलं नाही. या कवितेवर मनासारखी कविताच लिहिता आली नाही. पालावर अशा कितीतरी कविता गायब झाल्या, त्यांचं काय?**

बंगाली कँप चंद्रपूर शहराचा एक भाग. तेथून आंध्र प्रदेशात जाणारा हाय-वे लागतो. त्या हायवेवर थोडंसं लांब गेलं की शर्मा पेट्रोल पंप आहे. त्या पेट्रोलपंपाच्याच बाजूला पडीक जागा आहे. तेथे भटक्यांची पालं नेहमी उतरलेली असतात.

एकदा संध्याकाळी या रोडनं चालता चालता मी भटक्यांची पालं न्याहाळू लागलो, तवा पालावरून रडण्याचा आवाज आला. मी कान देऊन ऐकू लागलो. पालावर लेक्राबाळांचा आक्रोश चाललेला. आरे यार, ही आपली भटकी माणसं आहेत. माझे पाय बिराडाकडे ओढले गेले. मी पालाजवळ गेलो. मला बघताच गडीमाणसं पालात लपली. तरण्याताट्या बायकाही पालात घुसल्या. मथारे माणसं, मथाऱ्या बाया चाचरत चाचरत मह्यापासी आल्या. लेक्राबाळांचा आक्रोश चाललेला एकाएकी थांबला. समदी पालं चिडीचिप झाली.

मी उभ्याउभ्यानं आंधारात बोलीभाषेतून बोलायला सुरुवात केली. 'मी आपलाच तीन दगडाचा सोबती हाव म्हटलं. आपल्याच भिकार पंथातला माणूस आहे.' त्यांना माझं म्हणनं पटलं. लगेच बुढ्या बाढ्याईनं गोधडं आथरलं. बाकीच्याईला आवाज दिला. भराभर समदे पालाबाहेर आले. मी गोधड्यावर बसलो. समदे मह्याभौती बसले. तेवढ्यात एकजनानं चुलीत जाळ केला. त्या गडद अंधारात आम्हांला एकमेकांचे चेहरे दिसायला लागले.

मी बोलता बोलता त्यांना माझा परिचय दिला. 'येणार नव्हतो; पण पालावर रडण्याचा आवाज आला म्हणून आलो', म्हणलं. कारण याच पालातून माझ्या आयुष्याचा प्रवास झाल्याचं सांगितलं. तवा त्यांतला एक जन म्हणतो, ''तसं काही नाही सायब. झोपायाची येळ असतीया, लेक्रंबाळं चिरचिर करत्यात. ते तुम्ही रडण्याचा आवाज ऐकीला असेल.''

त्याचं वाक्य कट करत दुसरा म्हणतो, ''सायब आपल्या लोकाईची भाषा तसीच हाय, एटन छाप लोकं आपले. घोट-दोन घोट मारून बडबड करत्यात; ती बडबड तुम्हांला रडण्याच्या आवाजावानी ऐकू आली असन.''

तिकडे पलीकडे पालात दोन-तीन लेक्रं हुंदके देत होते. त्यांना दोन बायका समजवत होत्या. 'रडू नका' म्हणत होत्या. चूप राह्यला सांगत होत्या. तवा मी विचारलं, ''त्या पालात कोणीतरी रडतं आहे.''

''अं, ती लेक्रं आहेत सायब,'' ते.

''हं, त्यांच्याच रडण्याचा आवाज मी ऐकला वाटतं.''

''छे, त्यांचा आवाज ऐकला नसंल. ते तर आताच रडत आहेत.''

तेवढ्यात दारू पेलेला एक बुढा म्हणतो, 'आरे, आपल्या माणसाला तरी खरं सांगा ना रे.''

तवा समदेच त्याच्यावर सुटतात, आन त्याला गप राह्याला सांगतात. पण तो आर्धी-पाव दारू मारून असतो. कशाचा चूप बसतो. ''तुम्ही मला दबक्यात घेत हाईत का? म्या लयी डाव जेलात जाऊन आलो. जे होईल ते होईल, म्या खरंच सांगतो... कवितेचा तिकडं जीव चालला, आन् तुम्ही मला चूप राह्याला सांगता... आरे जे खरं हाय ते सांगा. आपला माणूस हाय. काहीतरी करंल...''

मी, ''काय सांगतात काकाजी?''

ते, ''काही नाही, दारू पेऊन बडबड करतोय मथारा.''

तेवढ्यात त्या पालातली लेकरं रडायला लागली. मी उठलो तवा दोगं-तिगं मला खाली बसवत म्हणाले, ''आहो सायब, जरा बेकार घडलं.''

मी, ''म्हणजे?''

ते, ''जाऊ द्या ना सायब, आपन आपलं बोलू.''

तवा मध्यातच एक बाई म्हणाली, ''काही नाही सायब, लोकाईन कविताची इज्जत लुटली.''

''कोणत्या लोकाईन.''

''कोनाला ठाऊक.''

''तिला बलवा.''

''येऊ शकत नाही ती, तिची कंबर मोडली. मेल्याईन इज्जत लुटली त लुटली, पण बिचारीची कंबर मोडली.''

तिने तसं म्हणताच दारू पेलेले दोघं-तिघं जन तिच्यावर सुटले. 'कशाला बडबड करती, बाराच्या भावात जाशील' म्हणले. ती ताडताड उठून गेली आन् पालात घुसली. मग मी

तिला खूप वेळा आवाज दिला, तिला बोलावलं; पण ती आलीच नाही...

मी उठलो. माझ्याबरोबर समदेच उठले. गेलो त्या पालाजवळ. मला बघताच लेक्रं रडायाचे थांबले. मी मोबाइलने उजेड केला. एक नागवी बाई पडलेली. मी मोबाइलचा उजेड बंद केला. 'चला, उचला, हिला सरकारी दवाखान्यात घेऊन जाऊ' म्हणलं. तवा ते म्हणतात, ''आता सायब, हिला कशाला दवाखान्यात नेयाचं. ती मार्गी लागली. एक-दोन दिवसाची सोबतीन हाय, वाट लागली की देऊ खड्ड्यात दाबून.''

''काय बोलताय तुम्ही.''

''जे खरं हाय तेच बोलतो.''

''आरे बाबाहो, दवाखान्यात नेल्यावर ती वाचेल.''

''आता कशाची वाचती सायब ती.''

''आपन प्रयत्न तर करून बघू.''

''आम्ही तिला घेऊन तुमच्यासंग नाही येणार. ते पोलीसवाले उलटसुलट विचारून आमच्यावरच केसेस भरतील. बिनगुन्ह्याचंच बिनभाड्याच्या खोलीत जावावं लागंल.''

''आरे, काही होत नाही. मी आहे ना संगं. तुम्ही हिला दवाखान्यापसवर नेऊ लागा. मग वापस या. पुढे मी बघतो.''

''जाऊ द्या ना सायब, आज नाही उद्या दिवसा नेऊ हिला सरकारी दवाखान्यात.''

''आरे आता कसं करू यार.''



मग जराशा वेळानं 'काय झालं ते सांगा' म्हणून त्याईला पुन्हा पुन्हा विचारलं, पण ते सांगतच नव्हते. आख्रीला कंटाळून मी त्याईला म्हणलं, ''अरे बाबाहो, मला काही भेयाचं कारण नाही. मी आपलाच माणूस आहे. मला सांगा ना...''

मग ते बोलायला लागले. ''आता आपलाच माणूस म्हणून आम्ही तुम्हाला सांगतो सायब. हिचं नाव कविता धारणे. पोलिसांनी हिच्या नवऱ्याला एक दिवस पेट्रोल पंपावर दरोडा टाकला म्हणून पकडून नेलं. साले पोलीसवाले कोठंबी, कोणीबी चोरी केली की आपल्याच लोकांला पकडून नेतात. हिच्या नवऱ्यात मुंगी मारायची ताकत नव्हती, तर दरोडा कसा टाकंल? आमची भी बिराडं होती संगमंगच. रात्री पोलिसांनी पालावर गराडा टाकला. आम्ही समदे निसटलो, पण हिचा नवरा सापडला. तापानं बिमार होता म्हणून पोलिसांच्या हाती लागला... पोलिसांनी त्याला पकडून नेल्यावर खूप कुताडला. एवढा कुताडला की सुटून आल्यावर तो पांगळाच झाला... त्याला बरोबर चालता येत नव्हतं. त्याच्या समद्या आंगावर पोलिसांच्या माराच्या गाठी गाठी झाल्या. त्यातच तो मेला...

''कविताला दोन-तीन बारकी बारकी लेक्रं हाईत. बाई लईच पतिव्रता हाय. तिच्या डोक्यावरचा पदर हटायाचा नाही. तिचा नवरा मेल्यावर ती तिच्या मथाऱ्या सासऱ्याचे आसऱ्यानं राह्याची. लेकराईला, मथाऱ्या सासऱ्याला घेऊन ती आमच्या बिराडासंग मुलूख हिंडायाची...

''सातआठ दिवस झाले. आम्ही चंद्रपूरला आलो. शहर मोठं हाय. हितं भीक चांगलं मिळतंया. कविता रोज आमच्या बायकांसंग गावात भीक मागायला जायाची. लेकरंबाळं जगवायाची. आता सरकारानं आपल्या जातीवर शिकार करण्यासाठी बंदी घातली. शिकार आपल्या बापजाद्याचा धंदा, तोच बुडाला. आपल्या लोकांला, दुसरे लोक चोरच समजतात. काम मागायाला लोकाईकडं गेलं तर काम मिळत नाही. आता पोटासाठी काहीतरी करावं लागतं ना... त्याच्यानं खुशाल भीक मागतु आन जगतु...

''तिचा सासरा खूप मथारा झालता. आठ-पंधरा दिवस झाले, तो मेला. तिची हिंमतच खचली. गळ्याला दोन-तीन लेकरंबाळं आन् आधाराला गडी माणूस राहिला नाही म्हणून... तो बघा, तो झेंडा दिसतो ना, तिथंच तिच्या सासऱ्याला पुरलं...

''रोजच्यावानी कविता सकाळी भीक मागायला गेली. दोन दिवस आलीच नाही. आम्ही हवालदिल झालो. नेली असन

पोलिसांनी पकडून वाटलं. आमचा जीव पालावर लागंना. हिची लेकरंबाळं भी हुरहूर करू लागले. काय करावं काही सुचंना. आख्रीला हिंमत करून आम्ही गडी माणसं गावात तिला शोधू लागलो... ती सापडली नाही...

''आज सकाळी... त्या समुरच्या बेसरमीची झाडं दिसतात ना, तेथं कोणीतरी इवळत असल्याचा आवाज येऊ लागला. तेथं आमचा एक गडी हागायला गेल्ता. त्याच्या ध्यानात आलं. त्यानं आम्हांला बोलावलं. आम्ही कोन हाय म्हणून लपत लपत त्या ईवळणाऱ्याला बघायला गेलो.

''बघतो तर काय, तिथं कविताबाई नागवी पडलेली. तिला तसंच उचललं. आनलं पालावर. तिची कंबर मोडली. तिचं रक्त सुरू हाय. आता ती होशमधी नाही. ती बोलत-चालत नाही. नुसती बघते. तिच्यावर बलात्कार झाला सायब. सायब, साल्याईनं तिच्यावर बलात्कार केला तर केला, तिची कंबर मोडून टाकली. साले ट्रकवाल्याईनं तिचा खंगाळा केला असन. तिचं जाऊद्या सायब, आपन दुसरं बोलू. जिवाचं बोलू. तिचं बोलून तरी काय करायाचं आता. ती मार्गी लागली सायब.''

मी, ''आरे बाबाहो, एवढा मोठा अन्याय आपल्यावर झाला. आपन चूप बसायाचं. चला, उचला, आपन तिला दवाखान्यात नेऊ. पोलिसात तक्रार करू.''

''सायब, तुम्ही आमचे हाईत म्हणून आम्ही तुम्हाला सांगितलं. आता पोलिसात गेलू तर ते आमचीच उलट तपासणी करतील. आम्हांलाच ठाण्यात नेतील. आमचं जगनं आवघड करतील.''

''मी आहे ना.''

''सायब, 'मी आहे ना' म्हणणारे टायमावर निसटून जातात, आम्हीच फुकट मरतू. या अगोदर दोन-तीन डाव असं घडलं. जाऊद्या ना सायब, आम्ही कसंतरी भीक मागून जगतो, लेकरंबाळं जगवितो. तसं तर या गावात भीक चांगलं मिळतं. आम्ही कसेतरी पोटापाण्याला लागलो. आम्हांला जगू द्या ना...''

''पुन्हा असं दुसऱ्या बाईवर घडलं तर?''

''जे नसिबात असतं तेच घडतं सायब. सटविका लिखा कभी नही चुका... जन्मताच माणसाच्या कपाळावर जे देवानं लिहलेलं असतं ते कवाच चुकत नाही. आता कविता धारणेच्या नसिबात जे होतं तेच घडलं...''

''आरे बाबा, नसिब फिसीब काही नसतं. ह्या खुळचट कल्पना आहेत.''

''असं कसं म्हणता सायब?''

असं बोलता बोलता बरीच रात झाली. पोलीस केस करायला आन दवाखान्यात नेयाला ते राजी झाले. पोलीस स्टेशनमध्ये सकाळीच जाऊ म्हणले.

मी पुन्हा उठलो. मोबाइलचा उजेड केला, कविता धारणेपासी गेलो. तिचा चेहरा न्याहाळू लागलो. ती किलकिल्या डोळ्यांनी माझ्याकडे बघायली. तिची लेकरंबाळं तिच्या हाडामांसाच्या शरीराला बिलगलेली. हिचं काही बरंवाईट झालं तर ह्या किलबिलत्या जिवांचं कसं होईल...

मी निघालो. चालत चालत घरी आलो. बायकोला कविताची हकिकत सांगितली. ती अस्वस्थ झाली. आम्ही जेवन न करता तसेच झोपलो. झोपच येईना. डोळ्यांसमोर कविताच यायली.

सकाळी लवकर उठलो. प्रा. इसादास भडके यांना भेटलो. समदी हकिकत सांगितली. आम्ही दोघांनी कामाला सुटी दिली. निवेदन तयार केलं. कविताला सरकारी दवाखान्यात नेयाची तयारी केली. तिला ॲटोने दवाखान्यात आनायाचं ठरविलं.

आम्ही दोघांनी ॲटो घेतला, गेलो पालावर. समदे वाटच बघत होते. ॲटो थांबला, उतरलो. बघतो तर काय कविता धारणे कायमची गेली. तिच्या मातीची तयारी सुरू झालेली. मी अंगातला शर्ट काढून तिच्या उघड्याबंब आंगावर झाकलं.

मग बसलो ॲटोत. निघालो. आलो वापस. राज्य सरकार, केंद्र सरकार, मानवाधिकार आयोग, गृहखाते, पोलीस स्टेशन यांच्यासाठी तयार केलेलं निवेदन फाईलमध्ये ठेवून दिलं.

पाच-सात दिवसांनी त्या बेड्याकडे फिरत फिरत गेलो. तिथं दोन झेंडे दिसत होते. एक तिच्या सासऱ्याचा अन् दुसरा कविताचा. तिथं पालं नव्हती. तीन दगडांच्या चुली, साफसूफ केलेली जागा, आन् हे दोन झेंडे होते. मग भरून आलं. थोडा वेळ थांबलो. मनात अनेक विचार येत होते, जात होते. तसाच माघारी फिरलो. आलो घरी. बरेच दिवस अस्वस्थ होतो.

आता त्या हायवेने गेलो की, मला ते दोन झेंडे दिसतात. कविता माझ्या काळजावर घाव घालून जाते. मला उभा फाडून टाकते. मी तिला विसरण्याचा प्रयत्न करतो, पण ती विसरत नाही. अशा अस्वस्थ घटनांवर मी छोट्यामोठ्या कविता लिहितो. आतापर्यंत खूप कविता लिहिल्या... या कवितेवरही कविता लिहिण्याचा खूप प्रयत्न केला, पण जमलं नाही. या कवितेवर मनासारखी कविताच लिहिता आली नाही.

पालावर अशा कितीतरी कविता गायब झाल्या, त्यांचं काय? त्यांच्या प्रश्नांची उत्तरं कोणी देयाची... नारायण सुर्वेंची कविता मात्र मनात घोळते -

*जीवनापासून पळुन जावे तर जावे कुठे?*
*आकाशीच्या बापाशी पहिल्यापासुन वैर होते*
*एकट्यानेच गज तोडुन उडावे, एवढे बळ कुठे?*
*अवघ्या वाटांवर ठायी ठायी पहारे होते*

*बोंब मारून बोलवावा असा स्वर्ग आहेच कुठे?*
*ज्याच्यासाठी आमचे आतडे तिळतिळ तुटत होते*
*उठ! तेवढी कोपऱ्यातली तलवार शोधुन ठेव*
*एकेकाळी तिच्यावर मी माझे नसीब घासले होते.*

**अशोक पवार**
रामकृष्ण चौक, मातोश्री मागे, तुकुम, चंद्रपूर ४४२४००.
Mob. 9823563765

(दिल्ली येथील 'संस्कृती' प्रतिष्ठानच्या वतीने ३५ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या साहित्यिकाला दिला जाणारा सन्मान, या वर्षी अशोक पवारला मिळाला आहे. 'बिराड' आणि 'इळनमाळ' ही त्याची पुस्तके प्रसिद्ध आहेत.)



**नीलेश मोडक**

# महापूर...

युवा अभिव्यक्ती

**मराठी अस्मितेसाठी(?) लढा देताना गोगटेची बरीच प्रगती झाली. मोठमोठे फ्लेक्सबोर्डस्, होर्डिंग्जवर हल्ली त्याचे फोटो असतात. कुठलंसं पदही मिळालंय त्याला. हा व्याप सांभाळताना सिगारेट, दारू, गुटखा अशी चार-दोन व्यसनं लागली तर नवल काय, नाही का? सोबतच्या विद्यार्थ्यांचं पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालंय, गोगटे अजून टी.वाय.बी.एस्सी.लाच... त्यात काय? महत्त्वाचं म्हणजे त्याची हिरोगिरी अजूनही यशस्वीरित्या सुरू आहे. आणखी काय हवं? 'मराठी अस्मितेच्या रक्षणार्थ एका युवकाचं आत्मबलिदान!' असं एक सुंदर शीर्षक देता येईल. पण कॉलेज-ग्रुप, गणेश मंडळं इत्यादी ठिकाणी असे अनेक 'गोगटे' रोज जन्माला येताना दिसतात. 'त्यांच्यासाठी कुठली शीर्षकं योजावीत?'**

काही दिवसांपूर्वी जंजिऱ्याचा जलदुर्ग बघायला गेलो होतो. शिडाच्या नावेने दुर्गाच्या दिशेने संथ प्रवास सुरू होता. नावेत चाळीसेक लोक, त्यांची आपापसातील कुजबूज. पाण्याचा खळखळाट, मोकळा वारा, असंच सगळं. तितक्यात नावेतील तरुणांच्या एका घोळक्याने मोठमोठ्याने गाणी म्हणायला सुरुवात केली नि वातावरणच बदललं.

*'मालवण पाण्यामध्ये किल्ला,*
*शिवाजी आत कसा शिरला...?*
*मालवण पाण्यामध्ये किल्ला,*
*शिवाजी आत कसा शिरला...?*
*शिरला तर शिरला, बघतंय कोण?*
*अरे आपला प्रशा...*
*आणि म्हणतोय काय...'*
*''अश्विनी ये ना... ये ना...''*

नावेत हशा पसरला. प्रशानंतर अभ्या, आनंद, स्मिता अशी इतर नावे आणि 'दम मारो दम...', 'तडप तडप के इस दिल से आह निकलती रही...', 'लंबी जुदाईऽ' अशी अनेक (कदाचित समर्पक) गाणी ऐकायला मिळाली. गाणी आणि ती नाव ह्यांत काहीतरी संबंध होता, हे स्पष्टच होतं. व्यक्त होण्याचा हा एक प्रयत्न असेल का...?

हॉस्टेलमधील अनेक मित्रांची टोपण नावंच जास्त लोकप्रिय होती. उदा. गढूळ (आडनावाची मोडतोड करून), पहाडी (हिमाचल प्रदेशात राहणारा) इत्यादी... सारखं पुढे पुढे करणाऱ्यांचं वर्गीकरण 'लाल' ह्या वर्गात केलं जाई. अशी नावं ठरवताना स्वभावगुण व्यक्त होणं, हाच सर्वांत महत्त्वाचा निकष आणि उद्देशही. असंच एका मित्राचं नाव होतं 'आर्कूट बाबा'. लेक्चर-प्रॅक्टिकल बुडवून, सगळी कामं सोडून तासन् तास आर्कुटिंग करतो म्हणून तो 'आर्कूटबाबा'. हॉस्टेलमधील मस्ती सोडून, मित्रांचा प्रत्यक्ष सहवास सोडून तो आर्कुटिंग का करीत होता, ह्याचं उत्तर कधीच मिळालं नाही. पण 'कुठेतरी व्यक्त होणं' हा त्याचा एक महत्त्वाचा उद्देश असावा, असं वाटतं. आर्कुट, फेसबुक, ट्विटर, ब्लॉग अशा अत्याधुनिक माध्यमांचं तरुणांमधील वाढतं आकर्षण, वापर आणि त्यावर होणारी चर्चा बघता 'अभिव्यक्ती' हा उद्देश बऱ्याच अंशी स्पष्ट होतो.

आर्कूट प्रोफाईलमध्ये स्वत:बद्दल बरीच माहिती दिलेली असते. त्याद्वारेच मित्रांचे आवडते चित्रपट, नाटकं, कादंबऱ्या कुठल्या, ह्याचं एक सर्वेक्षण केलं. बहुतेक मित्रांचा 'रंग दे बसंती' हा अत्यंत आवडीचा चित्रपट असल्याचं लक्षात आलं. 'हा सामाजिक भान जागृत करणारा 'तरुणांचा' चित्रपट आहे'; 'सामाजिक-राजकीय प्रश्नांना वाचा फोडत उत्तर शोधण्याचा एक प्रयत्न', अशी काही कारणंही मिळाली.

'हे उत्तर कोणतं?...'

तर- चित्रपटातील हे शेवटचं दृश्य...

करण (चित्रपटातील एक प्रमुख पात्र) आपल्या मित्राच्या सहकार्याने केंद्रीय संरक्षणमंत्र्यांचा खून करतो. त्यानंतर एफ्.एम. रेडिओद्वारे आपल्या गुन्ह्यांची कबुली देऊन आपले विचार व्यक्त करतो. त्यादरम्यानचा हा संवाद.

''कोई भी देश परफेक्ट नही होता... उसे परफेक्ट बनाना पडता हैं...!

हम पुलिस में भर्ती होंगे, मिलिटरी जॉईन करेंगे, आय.ए.एस. बनेंगे, पॉलिटिक्स मे जाकर देश की सरकार चलाऐंगे...''

टाळ्यांचा कडकडाट... काहींच्या अंगावर शहारे आणि बरंच काही...!

चित्रपट संपल्यावर एक मित्र म्हणाला, ''देशातील सर्व आय.ए.एस. अधिकारी, पोलिस, मिलिटरीतील जवान-अधिकारी, राजकीय नेते मिळून एकूण संख्या किती असेल...? एकूण लोकसंख्येच्या दोन ते तीन टक्के...? कदाचित... म्हणजे केवळ दोन-तीन टक्केच लोक देश घडवतात का? उरलेल्या

सत्त्याण्णव टक्के भारतीयांची देशाच्या जडण-घडणीतील भूमिका काय? एक चांगला शेतकरी, शिक्षक, व्यावसायिक, नोकरदार, लेखक-कवी! थोडक्यात एक चांगला नागरिक बनून नाही का देशाला परफेक्ट बनवता येणार?''

मी नि:शब्द होतो..

'गुलाल' नावाचा एक उत्कृष्ट हिंदी चित्रपट बघितला. 'गुलाल'चं कथानकही महाविद्यालयीन तरुणांभोवतीच फिरतं. तरुणांच्या अभिव्यक्तीचा हा एक प्रामाणिक प्रयत्न वाटतो. चित्रपटात 'पृथ्वी-बना' नावाचं एका कवीचं पात्र आहे. हा कवी म्हणतो.

*'इस मुल्ख ने जिस शक्स जो काम था सौंपा,*
*उस शक्स ने उस काम की माचिस जलाके छोडी...!'*

प्रसिद्ध गीतांच्या विडंबनाद्वारे व्यक्त होण्याचा (तरुणांद्वारे अनेकदा केला जाणारा) प्रयत्न हा पृथ्वी-बना करत असतो.

*सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में हैं*
*देखना हैं जोर कितना बाजू-ए-कातिल में हैं...*
*वक्त आने दे, बता देंगे तुझे ऐ आसमां,*
*हम अभी से क्या बतायें क्या हमारे दिल में है...*
*ओरे बिस्मिल काश आते आज तुम हिंदोस्ताँ,*
*देखते के मुल्ख सारा ये टशन में थ्रिल में हैं...*
*आजका लौंडा ये कहता, हम तो बिस्मिल थक गये,*
*अपनी आजादी तो भैय्या लौंडिया के दिल में हैं...*
*आज के जलसों में बिस्मिल एक गुंगा गा रहा,*
*और बहरों का वो रेला नाचता महफिल में हैं...*
*देखना हैं जोर कितना बाजु-ए-कातिल में हैं...*
*वक्त आने दे, बता देंगे तुझे ऐ आसमाँ,*
*हम अभी से क्या बतायें क्या हमारे दिल में हैं...*
*सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में हैं...!*

भाऊ पाध्येंची 'राडा' ही एक महान कादंबरी. त्यातील 'मंदार अण्णेगिरी' नामक तरुणाचं प्रमुख पात्र एका व्यापक अर्थाने आजही तरुणांचं प्रतिनिधित्व करतं. मंदारवर चित्रपटांचा प्रचंड प्रभाव असतो. प्रत्येक घटनेसाठी तो सारखा चित्रपटातील एखादा प्रसंग सुचवत असतो. कधी एखादं समर्पक गीत तर कधी चित्रपटाची शीर्षकं योजत असतो (त्यांद्वारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करीत असतो.) त्याचा आणखी एक आवडता छंद-हिरोगिरी करत हिंडणे, राडा करणे. मंदारच्या जडण-घडणीला सामाजिक पार्श्वभूमी शिवसेनेच्या राडा संस्कृतीची आहे. तरुणांच्या अभिव्यक्तीचे हे संदर्भ आजही समकालीन वाटतात.

हा मंदार अण्णेगिरी म्हणतो, 'ही माणसं धड चांगली नाहीत. धड सडलेली नाहीत...!'

'राडा'च्या प्रती आज बाजारात मिळत नाहीत. भाऊ पाध्येही गेले. मराठी अस्मितेच्या रक्षकांनी(?) एक महान मराठी कलाकृती नष्ट केली. तरीही 'मराठी पाऊल पडती पुढे...' म्हटलं की सगळं विसरून स्फुरण चढतं...

कॉलेज संपवून एके दिवशी हॉस्टेलला परत निघालो होतो. सायंकाळी सहा-साडेसहाची वेळ असेल. साधारण माझ्याच वयाच्या दहा-बारा मुलांनी मला घेरलं. माझं नाव-गाव (हिंदीत) विचारू लागले. त्यात अरेरावी, भाईगिरीचा सूर होता. तितक्यात त्यांच्यातल्या एकाने मला ओळखलं असावं.

'तू मायक्रोला आहे ना?'

'हो.'

'आपलाच रे हा... चल ए चल.. जा होस्टेलला...'

मी सुटलो.

टीव्हीवर त्यावेळी मनसेच्या अमराठी-विरोधी राड्याच्या बातम्या झळकत होत्या...

काही दिवसांनी तोच मुलगा पुन्हा भेटला. त्याने मैत्रीचा हात पुढे केला.

'काय लफडं झालं ना, फोन कर मला.' असं म्हणून मोबाईल नंबरही दिला.

त्याचं नाव 'गोगटे'. मध्यम उंची, निमगोरा वर्ण, सडपातळ यष्टी, शर्ट किंवा टी-शर्ट. जीन्स किंवा साधी पँट घालणारा. थोडक्यात, एक सर्वसामान्य महाविद्यालयीन युवक. तो बी.एस्सी. झूलॉजीचा विद्यार्थी आणि कॉलेजमधील एका कुप्रसिद्ध ग्रुपचा खंदा कार्यकर्ताही होता.

पुढे बरेचदा आमची भेट झाली. आणि एक दिवस त्याने मला त्याच्या ग्रुपमध्ये येण्याबाबत सुचवले. नंतर काही दिवसांनी तोच म्हणाला, 'अभ्यास कर तू... लोच्या झाला... मला बोल... तू लफड्यात पडायचं नाय...'

मराठी अस्मितेसाठी(?) लढा देताना गोगटेची बरीच प्रगती झाली. मोठमोठे फ्लेक्सबोर्डस्, होर्डिंग्जवर हल्ली त्याचे फोटो असतात. कुठलसं पदही मिळालंय त्याला. हा व्याप सांभाळताना सिगारेट, दारू, गुटखा अशी चार-दोन व्यसनं लागली तर नवल काय, नाही का? सोबतच्या विद्यार्थ्यांचं पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालंय; गोगटे अजून टी.वाय.बी.एस्सी.लाच, त्यात काय? महत्त्वाचं म्हणजे त्याची हिरोगिरी अजूनही यशस्वीरित्या सुरू आहे. आणखी काय हवं? 'मराठी अस्मितेच्या रक्षणार्थ एका युवकाचं आत्मबलिदान!' एक सुंदर शीर्षक देता येईल. कॉलेज-ग्रुप, गणेश मंडळं इत्यादी ठिकाणी असे अनेक 'गोगटे' रोज जन्माला येताना दिसतात. 'त्यांच्यासाठी कुठली शीर्षकं योजावीत?' ह्याचं उत्तर जरा क्लिष्ट वाटतं, एवढंच....

चित्रपट-नाटकं बघणं, कथा-कादंबऱ्या वाचणं हा तरुणांचा आवडता छंद. त्यातील पात्रांनी प्रभावित होऊन केशरचना, पोशाख, चालण्या-बोलण्याची ढब बदलणं, हेसुद्धा सवयीचंच. ह्या कलामाध्यमांचा तरुणांवर बराच प्रभाव आहे. तेथून त्यांना प्रेरणा मिळतात असंही म्हटलं जातं. हे तरुण स्वत:ची अभिव्यक्ती ह्या माध्यमांमध्ये शोधत असतील का?

याउलट, लेखक-दिग्दर्शकांसाठी 'तरुण वर्ग' हा प्रेरणादायी विषय असतो. तरुणांच्या चालण्याबोलण्याची ढब, त्यांचे पोशाख... इथपासून ते त्यांचे विचार, ह्यांना एकत्र गुंफून




कथानक रचण्याचा प्रयत्न केला जात असावा. बऱ्याचदा थोडं पुढे जाऊन तरुणांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्नही केला जातो. म्हणूनच दृश्यकलांचं एक प्रमुख उद्दिष्ट 'समाज प्रबोधन' हेसुद्धा मानलं जात असावं; पण त्याचवेळी ही एक गंभीर जबाबदारी आहे असंही वाटतं...

सतीश आळेकरांनी लिहिलेलं 'महापूर' हे नाटक बघितलं. रंगमंचाऐवजी हा प्रयोग प्रेक्षकांच्या मधोमध करण्यात आला. प्रेक्षक आणि कलाकार हे अंतर मिटवून विषयाशी एकरूपता साधण्याचा हा प्रयत्न असावा.

**प्रवेश पहिला :**

नाटकातील (प्रमुख पात्र) एक तरुण स्वत:च्या घरात प्रवेश करतो. घरात त्यावेळी आई-बाबा कुणीही नसतं. खोलीत अंधुकसा प्रकाश तेवढा पसरलेला. काहीसा घाबरलेला हा तरुण दबक्या पावलांनी टेबलाजवळ जातो. ड्रॉवरमध्ये काहीतरी शोधू लागतो. मग हळूच एक फोटो बाहेर काढून न्याहाळू लागतो. दचकून, घाबरून पुन्हा लपवून ठेवतो. मग टेपरेकॉर्डर सुरू करतो. चार-दोन गाणी बदलल्यावर त्याला हवं असलेलं गाणं लागतं... माइकल जॅक्सनच्या ह्या गाण्याचे बोल आहेत.

*''ऑल आय वाँट टू से इज दॅट,*
*दे डोंट रिअली केअर अबाऊट अस...''*

तो तरुण नाचू लागतो... बेभान होऊन... दात-ओठ घट्ट आवळून. हाताच्या मुठी घट्ट बंद करून... क्षणात त्याच्या कपाळावरून घाम ओघळू लागतो. पाय वेडे-वाकडे पडू लागतात. तेवढ्यात त्याच्या पोटात कळा येऊ लागतात, असह्य कळा.... तो अडखळतो... थांबतो... मग टेबलावरची दोरी घेऊन उड्या मारू लागतो. पोटात होणाऱ्या वेदना चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागतात. मधेच दोरीत पाय अडकून तो पडतो... सावरतो... गाण्याचा आवाज (आणि अर्थही) खूप स्पष्ट होतो. मग हा तरुण उंच उड्या मारू लागतो... दोन्ही हात हवेत लांबवून अधिकाधिक उंच जाण्याचा जीवतोड प्रयत्न करू लागतो. उंच उड्या आणि 'ते' गाणं एवढंच फक्त...!

हळूहळू प्रकाश मंद मंद होतो. हळूहळू सर्वत्र अंधार पसरू लागतो...

नाटकाचा नायक, तो तरुण (आणि त्याच्या त्या उड्या) दाट अंधारात दिसेनासा होतो...

अंधाराआड तोवर महापूर आलेला असतो... अव्यक्त भावनांचा महापूर...!

अंधारातून कानांवर पडलेले हे काही शेवटचे शब्द...

*''ऑल आय वाँट टू से इज दॅट,*
*दे डोंट रिअली केअर अबाऊट अस...''*

**नीलेश मोडक**
Mob. : 9975057347
Email : neeleshdmodak@gmail.com

(कारंजा (जि.वाशिम) येथील नीलेश मोडक नुकताच एम.एस्सी. (मायक्रोबायलॉजी) झाला असून, त्याच विषयात पीएच.डी. करण्यासाठी तयारी करीत आहे.)



स्नेहा अवसरीकर

युवा अभिव्यक्ती

# आर.जे. शुभ्रा आणि आर.जे. स्मिता

**स्मिता किंवा शुभ्रा या फक्त आजच्या रेडिओ चॅनल्सच्या प्रातिनिधिक आरजेज; जुन्या, जाणत्या, अनुभवी. असे अनेक नवे चेहरे, नवे आवाज आवाजाच्या क्षेत्रात स्वत:ला आजमावून पहात आहेत, स्वत:चे स्थान निर्माण करत आहेत. स्पर्धा तर आहेच; पण आव्हानेही खुणावत आहेत. मनोरंजनाची एक मोठी इंडस्ट्री अनेकांना सामावून घेण्यास उत्सुक आहे.**

'आकाशवाणीचं हे पुणे केंद्र आहे...' ह्या एकमेव आवाजाची मक्तेदारी पुण्यातच काय, अवघ्या महाराष्ट्रभर होती. साधारण २००० सालापर्यंत. २००० सालानंतर आपल्या एकूणच भवतालात खूप बदल झाले. पुण्याचा चेहरा बदलला तो याच काळात. याच काळात आयटी क्षेत्र पुण्यात विस्तारलं. जागतिकीकरण स्थिरावू लागलं. तसं भारतातही याच २००० सालात सरकारने 108FM फ्रिक्वेन्सीज जाहीर केल्या. त्यानंतर टाइम्स ग्रुपने प्रथम FM चॅनेल सुरू केलं. यामागचा हेतू असा होता, की 'या रेडिओ चॅनेलद्वारे आपण एका मोठ्या परिसरात लोकांशी संवाद साधू शकू. जाहिरातदारांना आकर्षित करू शकू.' नंतरच्या काळात सरकारने हे कॉन्ट्रॅक्ट काही कारणाने रद्द केलं; मात्र टाइम्सचा रेडिओ चॅनेल सुरू राहिला.

२००१-२००२च्या आसपास एकीकडे रडिओ - ऑल इंडिया रेडिओ - आकाशवाणी आपला आब राखून निश्चिंतपणे आपला आवाज पोहचवत असतानाच, रेडिओ मिर्चीचे आगमन पुण्यात झाले. त्याची सुरुवातच होती... "93.3 FM रेडिओ मिर्ची its hot..." या नव्या आवाजाविषयी सुरुवातीच्या काळात प्रचंड उत्सुकता होती... कुतुहल होते. आवाजातला नवेपणा, फ्रेशनेस आकर्षित करणारा होता. प्रतिक्रिया अर्थातच संमिश्र होत्या, पण... 'Radio Mirchi... its hot' असं काहीसं ऑड, मॉड, पुणेरी संस्कृती बाहेरचं स्लोगन पाहता पाहता परिचयाचं झालं. हवेत तरंगणारे हे आवाज शेवटी रुळले. स्थिरावले. सुरुवातीला क्वचित उथळ वाटणारी ही बडबड, बक्बक् वाटावी अशी हिंग्लीश भाषा... जाहिरातीच्या फोडणीसह बॉलिवूड गाण्याचं म्युझिक सतत कानावर आदळणारं हे चॅनेल अखेर टीनएजपासून पस्तीशीपर्यंतच्या तरुणाईला आपलसं करू लागलं. तरुणाईची बोलीभाषा बनून गेलं.

रेडिओ मिर्ची मुळात टाइम्स एम.एम. म्हणून अवतरली. भारतात इंदौरला पहिलं मिर्ची प्रसारण सुरू झालं १९९३ साली. आणि आज सहा मेट्रो शहरांसह भारतात केवळ रेडिओ मिर्चीची ३३ स्टेशन्स सुरू आहेत; आणि आज प्रायव्हेट चॅनेल्सच्या तुलनेत जाहिरात दराच्या दृष्टीने पाहता सगळ्यांत महागडं स्टेशन म्हणून प्रस्थापित झालं आहे.

पुण्यात अर्थात २०००-२००१ मध्ये रेडिओ मिर्ची सुरू झालं. एखादं रेडिओ स्टेशन लोकप्रिय होण्यासाठी रेडिओचा चेहरा असतो तो रेडिओचा आवाज. हा आवाजच लोकांपर्यंत पोहोचतो. रुजतो. संवाद साधतो. एफ.एम. चॅनेल्समध्ये आवाजासाठी निवेदक ही संकल्पनाच नाही. तिथल्या स्टुडिओत असतो 'आर.जे.' (रेडिओ जॉकीज).

पुण्यातल्या रेडिओ चॅनेल्सला आवाज असणाऱ्या निवडक आरजेंपैकी काही जुन्या, लोकप्रिय, मॅच्युअर अशा आरजेंची भेट घेतली. या आरजेंच्या कामाबरोबरच त्यांचं व्यक्तिमत्त्व जाणून घ्यावं या उत्सुकतेतून. त्यांपैकी एक लोकप्रिय आरजे म्हणजे 'शुभ्रा'... आठवतेय? रेडिओ मिर्ची नव्यानं सुरू झाली, त्यावेळी सकाळी सकाळी चहा पिताना, पेपर वाचताना, ब्रेकफास्ट घेताना एका बाजूला शुभ्राचा शो सुरू असायचा 'दिन हुवा बिगीन'. रेडिओवर ऐकू येणारा तो 'कार्यक्रम' आणि थिएटरमध्ये जाऊन बघता येणारा तो 'शो'. अशा आमच्या सगळ्यांच्या स्पष्ट संकल्पना असताना, शुभ्राचा 'शो' असायचा. तिचा आवाज आमच्यासाठी नवीन होता. आमची सकाळी एकीकडे कामांची घाई असताना, ती सतत छान गप्पा मारायची, किस्से ऐकवायची, ट्रॅफिक, हवा, ठळक घडामोडी सगळं ऐकवत आम्हांला आपोआप सहज अपडेट करायची... याशिवाय गाणीही असायचीच.

शुभ्रा परवा भेटली ती 'रेडिओ वन'च्या स्टुडिओत. कॅम्पातल्या गर्दीच्या परिसरात शुभ्र रंगाची 'रेडिओ-वन् मिडडे'ची बिल्डींग. तिथे सध्या दुपारी २ ते ४ या वेळात ती पुणेकरांशी गप्पा मारते. एसएमएस मागवते, गाणी ऐकवते. मजेत असते.

शुभ्रा मूळची चंदिगढची. साधारण २००१ सालापासून पुण्यात आली आणि इथलीच झाली. त्याचं कारण सांगताना ती म्हणते, 'यहाँ का मोसम... और एक बात है, स्त्रियांसाठी इथं फार सुरक्षित वातावरण आहे.'

शुभ्रा आज जरी लोकप्रिय आरजे असली तरी ती मूळची शिक्षिका होती. 'लाईफ में जितने भी एक्सपीरियन्स है... लेना चाहिए...' ती ठामपणे म्हणते. आणि एक अनुभव म्हणूनच तिने २००२ साली रेडिओ मिर्चीची ऑडिशन (आवाज चाचणी) दिली. आणि अर्थात पहिला शो सुरू केला, 'दिन हुवा बिगीन.' या पहिल्या कार्यक्रमाच्या अनुभवाविषयी ती सांगते, 'सुबह का टाइम था... तो अच्छी अच्छी बाते करती थी। पॉझिटिव्ह थिंकींग के बारेमें बोलना था। बहुत छोटी छोटी कहानिया, किस्से ढूंढना



आर.जे. शुभ्रा

पडता था। रोज का कार्यक्रम था। और इसमे हर वक्त एक ताजगी रखना, यही चॅलेंज था।'

'दिन हुवा बिगीन'बद्दल आणखी बोलताना शुभ्रा म्हणते, 'हा कार्यक्रम माझ्यासाठीही फार वेगळा अनुभव होता. माणूस म्हणून माझ्यातही काही सकारात्मक बदल झाले.' त्यानंतर ती रात्रीचा 'पुरानी जीन्स' हा कार्यक्रमही करायची. ह्या कार्यक्रमात जुनी हिंदी गाणी, हिंदी सिनेमे, त्यांतले पडद्यामागचे किस्से, गॉसिप्स... आपल्या बहारदार संवादाने शुभ्राने हाही कार्यक्रम लोकप्रिय बनवला. ती सेलिब्रिटी बनली ती याच काळात. रेडिओच्या माध्यमात केवळ आवाजानं, संवादानं मिळणारं ग्लॅमर तिला अनुभवता आलं.

'टाईमलेस क्लासिक्स' असाही एक शो तिने केला आणि नंतर मात्र ती पुन्हा एकदा शिक्षकी पेशाकडे वळली. 'दिल्ली पब्लिक स्कूल'मध्ये पुन्हा मुलांना शिकवू लागली. साधारण २००३ पासून २००६ पर्यंत ती दिल्लीला होती. मुलांबरोबर काम करण्याचा वेगळाच आनंद तिला मिळाला.

आणि २००६ मध्ये ती पुन्हा एकदा मिर्चीत आरजे म्हणून जॉइन झाली. यावेळी तिचा शो होता 'टोटल फिल्मी.' याच काळात पुण्यात रेडिओ सिटी, रेड एफ.एम. सारखी नवी चॅनेल्स सुरू होत होती. २४ तास मनोरंजन, गाणी, माहिती, संवाद, आवाजाच्या क्षेत्रात गर्दी होत होती. आरजेंसमोर प्रचंड स्पर्धा होती, सतत नवं देण्याची. नव्या नव्या आवाजांना वाव मिळत होता आणि आता हातोहाती असणाऱ्या मोबाईलसमुळे एकूणच या क्षेत्रातल्या क्रांतीमुळे रेडिओ नव्यानं लोकप्रिय होत होता. एकूण वातावरणच बदललं होतं. आरजेंना केवळ शो नव्हे तर इतर बॅकस्टेजची कामही बघावी लागतात. त्यानुसार शुभ्रा नव्या आरजेंना ट्रेनिंग देण्याचं काम करायची; शिवाय इतर ३२ रेडिओ मिर्ची स्टेशन्सच्या समन्वयाचं कामही पहायची. जवळपास दोन वर्षांनंतर कामात सॅच्युरेशन जाणवायला लागलं. एक स्त्री म्हणून असणाऱ्या सांसारिक जबाबदाऱ्याही होत्याच. शिवाय, कलाकार म्हणून सतत नव्या नव्या अनुभवांची उत्सुकता होतीच. त्यामुळे तिने तडकाफडकीच मिर्चीला 'बाय' म्हटलं.

पडद्यामागे राहून तिची काही कामं चालू होतीच; पण ॲक्टिव्ह रेडिओतल्या कामाचं आकर्षण टिकून होतंच. 'मिड डे'च्या रेडिओ वन्‌ला ती डिसेंबरपासून नव्याने जॉईन झाली. 'मॅक्झिमम म्युझिक फटाफट' अशी कॅचलाईन असणाऱ्या रेडिओ वनमध्ये ती दुपारचा शो करते.

रेडिओच्या एकूणच कामाविषयी सांगताना ती म्हणते, 'इथं चालणारं सगळंच काम एक टीमवर्क आहे. इथं स्ट्रेस आहे, पण मदतीला धावून येणारी टीम आहे आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे '२४ तास चालणारं म्युझिक' आहे. संगीताची साथ तुमचा मूड सतत फ्रेश ठेवू शकते. घरातला आणि ऑफिसमधला कुठलाही ताण घेऊन तुम्ही एकदा स्टुडिओत गेलात, म्युझिक ऑन केलं, की मूड बदलतोच. इथं काम करताना – खास करून आरजे म्हणून काम करताना सहा वर्षांपासून साठ वर्षांपर्यंत कुणाशीही, कुठल्याही स्तरातल्या व्यक्तीशी सतत संवाद साधण्याचं कौशल्य हवं. समोरच्या व्यक्तीला समजावून घेण्यासाठी पेशन्स हवा. गप्पा मारण्यासाठी भाषेत चटपटीतपणा असणंही आवश्यक; पण त्यासाठी तुम्ही मुळात 'चांगलं माणूस', 'चांगली व्यक्ती' असणं आवश्यक आहे. बोलण्यात माणुसकी तर असायलाच हवी. माझ्या आईवडिलांचे संस्कार इथं उपयोगी पडतात. तुमचा आवाज मुळात चांगला असणं हा एक भाग आहे. शिवाय, तुमचे विचार, व्यक्तिमत्त्व तुमच्या आवाजातून जाणवायला हवं. फ्रेंडली पर्सनॅलिटी हवी. 'अगर बंदा अच्छा हो, तो आवाज अच्छीही लगती है', शुभ्रा आवर्जून सांगते.

पुण्यातल्या सदाशिवपेठी मध्यमवर्गीय मराठी पुणेकरांपासून कँपमधल्या जुन्या अमराठी पुणेकरांपर्यंत आणि कोथरुडपासून पलीकडे पसरलेल्या नव्या श्रीमंत पुणेकरांपासून औंध, बाणेर, हिंजवडीकडच्या आयटी पुणेकरांपर्यंत सर्वांना अतिशय आपला वाटणारा आवाज आरजे स्मिताचा. तिचा आवाज 'ऑथेन्टिक' वाटतो. इंग्लिश, मराठी, हिंदी भाषेपलीकडे जाऊन संवाद साधणारा आवाज!

स्मिता मूळची नाशिकची, पण शिक्षण मात्र पुण्यातच झालं. एम.एस्सी. करताना (मॉडर्न कॉलेज) तिने टाइम्स एफ़एम्‌ची ऑडिशन दिली. ३५०० जणांतून तिची निवड झाली. याचं कारण त्याआधी ती नाशिकच्या लोकल स्टेशनवर अँकरिंग करायची. रेडिओ ऐकत असायची. मराठी, हिंदी, इंग्लिश अशा तीनही भाषांवर तिचं प्रभुत्व होतं. शिवाय, तिचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास होता; पण तरीही मुंबईला ट्रेनिंगला गेल्यावर इतर अमराठी ट्रेनीजमध्ये तिचं मराठी असणं अवघड गेलंच. पण या अवघडलेपणावर मात करून ती रेडिओ मिर्चीत जॉईन झाली, आरजे म्हणून. सुरुवातीला 'आलाप' हा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम ती करायची. पण पुणेकरांना हा 'आलाप' आपला



**आर.जे. स्मिता**

वाटला नाही. पत्रांअभावी हा कार्यक्रम आठ-नऊ महिन्यांत बंद झाला. (हो, मिर्चीतही श्रोत्यांच्या पत्रांची दखल घेतात.)

मग स्मिताने 'खूबसुरत' शो सुरू केला. खास पुणेकर स्त्रियांसाठी, तरुणींसाठी. काय नव्हतं यात? स्त्रियांचं आरोग्य, योग, सौंदर्य, रेसिपीज, समुपदेशन, फॅशन्स, नातेसंबंध, सल्ला, गाणी, गप्पा, गॉसिप्स. हा शो म्हणजे एक मासिकच असायचं स्त्रियांसाठी आणि स्त्रिया दुपारच्या फावल्या वेळी निवांत ऐकत रहायच्या.

स्मिता या अनुभवाविषयी भरभरून बोलते, ''ह्या शोनं मला नाव दिलं. पुण्यातल्या अनेक तरुणींशी मला जोडून घेता आलं. अनेक कुटुंबातली मी सदस्य बनले. मला घराघरात पोहोचता आलं. खूप वेगवेगळे अनुभव दिले. 'खुबसूरत'मध्ये मी कसलीच तडजोड केली नाही. माझ्यातलं 'बेस्ट' दिलं. पुणेरी मुलींसाठी ऐश्वर्या राय ते सोनाली कुलकर्णी अशा साधारण ३५०च्या आसपास जणींशी संवाद साधला. रुटीन कामापलीकडे जाऊन काही वेगळे अनुभव घेतले. एका दिवाळीत पुण्यातल्या महापौरांच्या घरी ३०० मुलांसह दिवाळी साजरी केली. त्या निमित्तानं वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या. अगदी दिवाळीचा फराळही होता. आणि हा सगळा कार्यक्रम मी एन्जॉय करत असताना रेडिओवर लाईव्ह ऐकला जात होता. अशीच एकदा राखीपौर्णिमेला 'प्रीतमंदिरातल्या मुलांना राखी बांधायला जातेय' असं रेडिओवरून श्रोत्यांना सांगितलं, तर त्यावेळी खरोखरच अनेकजण प्रीतमंदिरात आले. राख्या बांधल्या, मिठाई वाटली लोकांनी. हा सगळा अनुभव माझ्यासाठी आयुष्यभराची शिदोरी आहे.''

'आरजे बनण्यासाठी तुमच्यामध्ये मुळातच काय असावं लागतं' यावर बोलताना ती म्हणते, 'केवळ चांगला आवाज पुरत नाही, व्यक्तिमत्त्व असावं लागतं. व्यक्तिमत्त्वातला खरेपणा आवाजातून लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. हा काही लगेच तयार होत नाही. लहानपणापासूनचे संस्कारच हवेत. वाचन हवं, विचार हवेत. मुळात तुम्ही कसे डेव्हलप होता, कोणकोणती माणसं तुम्हांला भेटतात, तुम्ही त्यांना कसं समजावून घेता, यांतूनच तुमचं व्यक्तिमत्त्व घडतं. माणूस वाचता येणं महत्त्वाचं आणि लोकांना वाचत राहणं ही सतत चालणारी प्रोसेस आहे. यासाठी खूप पेशन्स असायला हवा...'

आरजे बोलतात... खूप बोलतात... बोलतच राहतात... याविषयी ती म्हणते, की ''हो आम्ही बोलतो... दोन मित्र खूप काळाने भेटले, की जसे बोलत राहतात तसे बोलत राहतो. लोकांना वाटतं की १० शब्द इंग्लिश बोलले, १० हिंदी आणि १० मराठी शब्द टाकले की झाली भाषा तयार. पण तसं नाही. हिंदी, मराठी आणि इंग्लिश भाषा आणि त्यांतले बारकावे समजून घेणं महत्त्वाचं. म्हणजे, 'मै बताऊंगी तुम्हे ट्रॅफिकका हाल...' तेव्हा हिंदी 'हाल' आणि मराठी 'हाल... हाल' समजायलाच हवं. शिवाय भाषा काहीही असली तरी, न दिसणाऱ्या लोकांशी सतत संवाद साधायचा आहे हे भान असणंही आवश्यक असतं. आपण कुणाला दुखवत नाही ना, हे महत्त्वाचं. कुणी स्मोकिंग करत असेल, हेल्मेट न वापरता गाडी चालवत असेल... तर बोलेन मी पण आदब जपणं आवश्यक.''

इथं बोलताना कुठलीच चूक करून चालत नाही. त्यामुळे तयारी करताना ती परफेक्ट असावी लागते. एक तासाचा शो असला तरी तीन तास तयारीत जातात. रोजचं कामच ९ तासांपासून १२ तासांपर्यंत आणि एक आरजे म्हणून तर २४ तास प्रोसेस सुरू राहते.

स्मिता किंवा शुभ्रा या फक्त आजच्या रेडिओ चॅनल्सच्या प्रातिनिधिक आरजेज. जुन्या, जाणत्या, अनुभवी. असे अनेक नवे चेहरे, नवे आवाज आवाजाच्या क्षेत्रात स्वत:ला आजमावून पहात आहेत. स्वत:चे स्थान निर्माण करत आहेत. स्पर्धा तर आहेच; पण आव्हानेही खुणावत आहेत. मनोरंजनाची एक मोठी इंडस्ट्री अनेकांना सामावून घेण्यास उत्सुक आहे.

**स्नेहा अवसरीकर**
Mob. 9764029370
snehaa_a@rediffmail.com

(पुणे येथून प्रकाशित होणाऱ्या 'अंतर्नाद' या वाङ्मयीन मासिकात काही वर्षे संपादन सहाय्यकाचे काम केल्यानंतर स्नेहा अवसरीकर सध्या पुणे आकाशवाणीसाठी काम करीत आहे.)



युवा अभिव्यक्ती

# तारुण्याची जाणीव

चंद्रशेखर पाटील

**मी जेव्हा माझ्यासाठी मुलगी पहायला गेलो होतो, तेव्हा होणाऱ्या गप्पांत भांडारकर संस्थेवर संभाजी ब्रिगेडने केलेल्या हल्ल्याचे एकजण समर्थन करीत होता, त्यावेळी बाकीच्या लोकांचे आपल्या बोलण्या-वागण्याकडे बारीक लक्ष आहे हे लक्षात येत असूनही, मी माझी मते काहीही हातचे राखून न ठेवता मांडली होती. पण गेल्या चार-पाच वर्षांत मात्र व्यावसायिक जगात पूर्णवेळ उतरल्यावर, रोजच्या वर्तमानपत्रांचे वाचनसुद्धा नीट झाले नाही. प्रश्न नुसत्या वेळेचा नव्हता; तर कल कशाकडे आहे हा होता. पूर्वी रोज चार-पाच तास व्यायाम करणाऱ्या मला, गेल्या तीन-चार वर्षांत पंधरा-वीस मिनिटेसुद्धा व्यायाम करणे जमले नाही. पण आता थोडेसे स्थैर्य आल्यावर माझ्या पेशाकडे बघण्याचा दृष्टिकोन तर बदलत आहेच, पण अर्थार्जनाव्यतिरिक्त इतरही तितकेच महत्त्वाचे मुद्दे मला पूर्वीप्रमाणे विचार करण्यास भाग पाडत आहेत.**

'आज भाऊ भावाला ओळखत नाही.'

'अरे, तो तर साहेबांच्या चुलतआत्याच्या मुलीचा जावई आहे, त्याचं काम होणारच!'

'राजकारणी लोक कोणाचे असतात? त्यांना स्वत: पलीकडे कधी काही दिसतं का?'

'अरे ते मंत्री त्याचे जातवाले आहेत, त्यामुळे त्यालाच टेंडर मिळणार.'

अशी अनेक वाक्ये आपल्या कानावर पडत असतात, पण त्यांतील विरोधाभास लक्षात घेतला जात नाही. बहुतेक वेळा परिस्थितीनुरूप व त्यातही व्यक्तिसापेक्ष निष्कर्ष काढले जातात. उदा. 'हा फार जातीयवादी आहे बुवा' किंवा 'आजकाल सरळ माणसांना जगणंच अवघड झालं आहे' इत्यादी. आणि शेवट एकमताने (कोणी आक्षेप घेत नाही म्हणून एकमताने म्हणू या.) 'बी प्रॅक्टिकल! व्यवहार म्हटलं की या सगळ्या तडजोडी आल्याच!'

लोकांची आपापल्या कार्यक्षेत्राबाबतची स्वतंत्र मते, गृहीतके आपल्या बुद्धीच्या कसोटीवर पारखूनच तयार झालेली असतात. मग अशी मंडळी सामाजिक बाबतीत चिकित्सा करताना का दिसत नाहीत? विविध विषयांवरील चर्चेत मते मांडताना चिंतनाचा अभाव स्पष्ट दिसून येतो. आपण आपल्याच विधानाच्या विरोधी मत मांडत आहोत, हेही लक्षात घेतले जात नाही.

सामान्यत: स्वत:वर वेळ येत नाही तोवर सामाजिक प्रश्नांवर आपण चिंतन करीत नाही, असा आक्षेप मी अनेकवेळा नोंदवत आलोय, विशेषत: घरच्या मंडळींसोबत! उदा. सजातीय विवाहाचा आग्रह, स्त्रियांच्या पुनर्विवाहाला विरोध.

Management हा विषय शिकताना त्यातील एक वाक्य फार संयुक्तिक वाटले. More and more is the impact of any organisation on life, feabler are our responces. म्हणजे एखाद्या संस्थेचा आपल्या जीवनात जेवढा जास्त प्रभाव असतो, तेवढ्या कमी प्रमाणात त्याची चिकित्सा केली जाते. उदा. धार्मिक अनुष्ठाने. परंतु एखादा जोरदार अनुभव बहुतेक वेळा उपजत बुद्धीला उद्दीपित करण्यास कारणीभूत ठरतो. असाच एक अनुभव मलाही आला त्याविषयी...

निमित्त होते, सी.ए.च्या सेंट्रल कौन्सिल इलेक्शनचे. ही एक संसदेने पारित केलेल्या कायद्यानुसार स्वायत्त संस्था आहे. सेंट्रल कौन्सिल मेंबर्स या संस्थेचे धोरण ठरवतात. यात काही केंद्र शासनाचे प्रतिनिधी, तर काही निवडून आलेले प्रतिनिधी असतात. या संस्थेचा अध्यक्ष मात्र निवडून आलेल्या मेंबर्सपैकी असतो आणि मतदार असतात, भारतभर वा जगभर पसलेले भारतीय चार्टर्ड अकौंटंट 'सर्व सुप्तेषु जाग्रति' (म्हणजे, सर्व झोपलेले असतात तेव्हा आम्ही जागे असतो) या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे :

चार्टर्ड अकांऊंटंट हे आर्थिक बाबतीत बऱ्यापैकी संपन्न वर्गात मोडतात. उच्चविद्याविभूषित अशी त्यांची प्रतिमा असते. 'आमच्या सल्ल्याने चालणाऱ्याचे आम्ही भले करू शकतो' असा विश्वास ते बाळगतात. परंतु या वर्गाच्या दैनंदिन व्यवहाराची धोरणात्मक बाजू ठरवणाऱ्या कौन्सिलसाठीच्या इलेक्शनमध्ये गेल्या वेळेस मतदान किती झाले? ४५ टक्के पेक्षा कमी! पोस्टाने मतदान करण्याची व्यवस्था असतानासुद्धा! (जेव्हा सगळे जागे असतात तेव्हा हे झोपलेले असतात?)

मागील निवडणुकीत पुण्यातून कोणी तुल्यबळ उमेदवार नसल्याने, तेथील मतदानाच्या आधारे मूळ उत्तर भारतीय असलेले एक उमेदवार निवडून आले होते. निवडून आल्यावर हे महाशय प्रेसिडेंट झाले. एका स्वायत्त संस्थेमध्ये प्रेसिडेंट असल्याने बरेचसे अधिकार त्यांना आपसूकच मिळाले. गेल्या ५० वर्षांतील उच्च परंपरेला तडा जाईल असे बरेचसे वर्तन त्यांच्या हातून झाले. त्यात धोरणात्मक निर्णयापासून, (सरकारकडून ॲम्बॅसिडर गाडीची मान्यता असताना) महागडी स्कोडा गाडी घेण्यापर्यंतच्या निर्णयांचा समावेश करता येईल. त्यामुळे, आपल्या स्वायत्त संस्थेची प्रतिमा मोठ्या प्रमाणात खालावत चालली आहे, अशी भावना यापूर्वी अध्यक्षपद भूषविणाऱ्या व्यक्ती ते इतर मतदार

यांच्यात दिसून येत होती. माझे व्यक्तिगत मतही तसेच होते, पण करणार काय?

सार्वजनिक जीवनात बऱ्याच नेत्यांच्या बाबतीत हा अनुभव आपल्याला येतो व आपण अगदी 'हेल्पलेस' असल्याचा सूर लावून मोकळे होतो. त्यातही बहुतांश वेळ जातो तो, निवडून आलेल्या इतर उमेदवारांनी वेळीच अशा उपद्व्यापी उमेदवारांना. विरोध करण्यात दाखविलेल्या निष्क्रियतेला दोष देण्यात.

तर अशा परिस्थितीत पुण्यातील एस.बी.झावरे यांनी उमेदवारी जाहीर केली. ते गेली ३८ वर्षे सी.ए.चे क्लासेस घेतात. ज्यांना १२ वर्षे सर्व्हिस व १२ वर्षे प्रॅक्टीसचाही अनुभव आहे; ज्यांच्या क्लासेसने थोडेथोडके नव्हे तर ७००० पेक्षा जास्त सी.ए. तयार करण्यात हातभार लावला आहे, ज्यांच्या चारित्र्यावर कधीही– कोणीही– कसलाही संशय घेतल्याचे ऐकिवात नाही, असे ते झावरे. आपला पेशा सचोटीने करून सामान्य सी.ए.च्या तुलनेत कितीतरी पट अर्थार्जन त्यांनी करून दाखविले आहे. सरांच्या वक्तशीरपणाचा दरारा वाटावा, इतकी त्यांची ख्याती आहे. थोडक्यात, निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांत झावरेसर सगळ्यांत जास्त अनुभवी होते आणि सतत कार्यमग्न राहण्यात त्यांचा हात धरणे आमच्यासारख्या तरुणांसाठीसुद्धा अवघडच आहे. त्यामुळे एखाद्या संस्थेवर विश्वस्ताची भूमिका पार पाडण्यास झावरेसर अत्यंत योग्य उमेदवार होते.

दुसरा उमेदवार सर्वांत तरुण होता. तो प्रसारमाध्यमांत नोकरीस होता, पण त्याने पुण्यामध्ये सी.ए.साठी स्टडी सर्कल सुरू केले होते, व ते तो बऱ्याच चांगल्या प्रकारे चालवत होता. तो उत्तम संघटक होता, पण आय.सी.ए.आय. सारखी स्वायत्त संस्था चालविण्यासाठी लागणारा कुठल्याही प्रकारचा खास अनुभव त्याच्याकडे नव्हता. त्याच्याकडे एखाद्या विषयातील विशेष प्रावीण्य आहे. असेही कधी मतदारांना दिसून आलेले नव्हते. त्याने स्टडी सर्कल वा इतर ठिकाणी एखादे टेक्निकल सेशन घेतल्याचे ऐकिवात नव्हते. पण तरुण वर्गात मात्र विशेष लोकप्रिय म्हणता येईल, असा तो होता.

तिसरे उमेदवार सध्याच्या प्रेसिडेंटचे भागीदार होते व त्यांचीही प्रेसिडेंटप्रमाणेच प्रतिमा होती. त्यामुळे जे आक्षेप प्रेसिडेंटला लागू होते ते यांनाही लागू होते.

चौथे उमेदवार बहुतेकांना (ते कोण आहेत हेच) माहीत नव्हते, पण त्यांचा बायोडेटा वाचल्यावर मात्र, हेसुद्धा चांगले उमेदवार होऊ शकतात असे वाटायचे.

माझ्यापुरता विचार करता मी ठरवून टाकले, की आपल्याला चालू असलेल्या घडामोडींबाबत तीव्र आक्षेप आहेत, तर आपण या वेळी नुसतेच मतदान करायचे नाही; तर योग्य उमेदवारासाठी भरपूर वेळसुद्धा द्यायचा! आणि ही काही त्या उमेदवाराला केलेली मदत नसेल, तर तो आपला निर्णयप्रक्रियेतील सहभाग असेल. मी शक्य त्या परीने झावरेसरांसाठी प्रचार करायला सुरुवात केली. पण जेव्हा इतरांच्या नजरेत भरेल एवढ्या प्रमाणात प्रचार करायला सुरुवात केली, तेव्हा मात्र 'चांगले'च अनुभव आले.

प्रचाराचा भाग म्हणून वेगवेगळ्या लोकांना फोन करीत असताना, एक जवळचा मित्र दुसऱ्याच उमेदवाराचा प्रकार करीत असल्याचे कळले, म्हणून मी त्याला फोन केला.

मी : मित्रा, कोणाला मतदान करायचे?

मित्र : तू सांग.

मी : तूच सांग मी कोणाला मतदान करू?

मित्र : मी X Y Z ला मत देणार!

मी : कसे काय? म्हणजे कशाच्या तरी आधारावर ठरवलेस, की तो आपल्या ओळखीचा आहे म्हणून?

मित्र : 'हे बघ, हा आहे थोडा लफडेबाज माणूस, पण कुणीही निवडून आले तर आपल्याला काय देणार! आणि आपल्याला काही नको; पण आपल्या हातून काही चूक झाल्यास हा सावरून नेईल.' (सी.ए. लोक आय.सी.ए.आय.ला जेवढे घाबरतात, तेवढे कोर्टालासुद्धा घाबरत नाहीत; गेल्या ५० वर्षांत आय.सी.ए.आय.ने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात एखाद्या सी.ए.ने कोर्टात केस जिंकल्याचे ऐकिवातसुद्धा नाही.)

मी : मी तर झावरेसरांना मत द्यावं म्हणतोय.

मित्र : सरांना नाव ठेवताच येणार नाही, सर आमच्या ऑफिसला आले होते, तेव्हा मीही थोडा गडबडलो होतो, पण एक गोष्ट फार अवघड आहे.

मी : काय?

मित्र : सर फार ethical आहेत. एखादी बेकायदेशीर गोष्ट आपण सरांसमोर बोलूसुद्धा शकत नाही, मग असल्या गोष्टीत मदत करा असं म्हणणं तर दूरच राहील.

मी : बरोबर आहे, पण जर एखाद्याकडून चूक झालीच तर त्याला कमीत कमी exploitation होणार नाही एवढी मदत तर निश्चित करतील, असं तुला वाटत नाही का?

मित्र : तू म्हणतोस ते बरोबर आहे, पण...

मी : आपण जर अशा उमेदवारांना रोखलं नाही, तर हे लोक किती माज करतील? हा तर दुसरा दालमिया होईल?

मित्र : हो, तो तर तसाच आहे. पण...

(मला थोडा संशय आला आणि म्हणून 'If you can not convince them, then confuse them' या रणनीतीनुसार मी माझा मुद्दा बदलला.)

मी : माझ्या जागी तू सरांना काही प्रश्न/मदत विचारायला गेल्यास तुला वेगळी व मला वेगळी वागणूक मिळेल, असं तुला वाटतं का?

मित्र : सर एकदम impartial आहेत.

मी : मग अशा माणसांना मदत करणं आपलं काम नाही का?

मित्र : मी सरांना नक्की मतदान करीन, पण पहिलं की दुसरं, हे आता तरी नक्की सांगता येणार नाही.

त्याच्या या अजब तर्कशास्त्राने मी आश्चर्यचकित झालो होतो, म्हणून झाल्या संवादाबाबत दुसऱ्या एका मित्राशी चर्चा केली.

मी : अरे त्याच्या ह्या अजब लॉजिकला काय म्हणशील?

मित्र : काही नाही, त्याचं मूळ कारण वेगळं आहे. त्याने जवळपास २५० सी.ए.ची यादी केली आहे. बहुतेकजण एकाच जातीचे आहेत. मलाही फोन आला होता. त्याने यादीतल्या प्रत्येकाला कॉन्टॅक्ट करून सांगायला सुरूवात केलीय, 'हा आपला माणूस आहे आणि आपण त्याला मदत केलीच पाहिजे.' तुझ्याशी

त्याला असं बोलणं शक्य नव्हतं, म्हणून त्याने हे वेगळं कारण पुढं केलंय. अर्थात, ते कारणही बऱ्याच जणांच्या मनात आहे बरं!

मी : म्हणजे त्याला पटवत बसण्यात काही अर्थ नाही?

मित्र : तेच म्हणतोय मी तुला, पण सगळे काही तसे वागणार नाहीत. फक्त तोंडावर 'हो' म्हणतात एवढेच.

या दोघांशी झालेल्या चर्चेबाबत मी तिसऱ्या एका मित्राशी बोललो.

मी : तुला काय वाटतंय; जातीचा फॅक्टर खरा असेल? की, सर सरळमार्गी व तत्त्वनिष्ठ आहेत म्हणून हे लोक त्यांना नाकारताहेत?

मित्र : मूळ कारण फक्त आणि फक्त जातीचं आहे, सरांऐवजी दुसरा कोणी उमेदवार असता तर या मित्राने कुठला तरी वेगळा मुद्दा शोधून काढला असता.

मी : वेळ कमी आहे, काही तरी केलं पाहिजे. त्या २५० पैकी किमान १०० मते तरी सरांना मिळाली पाहिजेत.

मित्र : तू काहीही केलं तरी जातीचाच मुद्दा राहणार, या लोकांच्या डोक्यातून तो जाणार नाही आणि...

मी : आणखी काहीतरी म्हणत होतास...

मित्र : तूसुद्धा एवढा ॲक्टिव्ह कशामुळे झालास? सर मराठा आहेत म्हणूनच ना! सरांऐवजी दुसरा कोणी उमेदवार असता तर तू एवढा ॲक्टिव्ह राहिला नसतास...

मी : नाही! सर योग्य उमेदवार आहेत आणि अशा बंडल लोकांना रोखण्याऐवजी खंबीरसुद्धा आहेत. ते काही गणपुलेसारखे राजीनामा देऊन येणारे नाहीत आणि ते कितीही सरळ असले तरी निवडून आल्यावर कौन्सिलमध्ये त्यांच्या मताला सहजासहजी कोणालाही डावलता येणार नाही.

हे उत्तर देताना माझा आवाज वाढलेला होता. सामान्यत: माझा आवाज बऱ्यापैकी मोठा असला तरी, वाद-विवाद किंवा चर्चेत तो फार संयत असतो असं निदान मला तरी वाटतं.

आमची चर्चा येथेच थांबली. पण सामान्यत: बहुतांश लोकांचे सामाजिक विश्व हे नातेवाईक, काही मित्र व समव्यावसायिक एवढ्यांपुरतेच मर्यादित असते. त्यामुळे रोजच्या जीवनातील शिष्टाचार, परंपरा ह्या काही प्रमाणात का होईना, जातीनिहाय असणार. त्या अनुषंगाने असणारे स्वाभाविक आकर्षण समजण्यासारखे आहे.

निवडणुकीच्या प्रचाराच्या आखणीसाठी नियमित बैठका होत होत्या, त्यात एकाने हा मुद्दा जरा जोरात उपस्थित केला. तेव्हा सर आता काय आणि कशाप्रकारे प्रतिक्रिया देतात, याची मला उत्सुकता होती. पण सरांनी प्रश्नकर्त्याचा रोख ओळखून मध्येच त्याला आडवत प्रश्न केला.

'मी तुम्हांला परवा ठरल्याप्रमाणे मतदारयादी पाठवली होती, ती तुम्ही एरियावाईज सॉर्टआऊट करणार होता, ते काम झालं का?'

प्रश्नकर्ता : ऑं? हो करतो. पण सर....

सर : आपण आपल्या हातातल्या कामावर अधिक मेहनत घेतली पाहिजे ना!

मुद्दा वेगळ्याच पद्धतीने निकाली निघाला. थोड्या वेळाने आणखी काही लोकांनी तोच मुद्दा पुन्हा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा सर म्हणाले...

'हे पहा, एखादा माणूस सी.ए. असेल तर त्याला किमान बुद्धिमत्ता आहे असे तुम्ही मानता ना? मग त्याला स्वत:चे काही विचार असणारच की! सर म्हणो किंवा कोणीही म्हटल्याप्रमाणे तो चालणार नाही, तेव्हा तुम्ही थोडा स्वत:वर विश्वास दाखवा ना!'

सरांचे उत्तर मला फार भावले व पुढच्या प्रचारात मी त्यांच्या स्पष्टीकरणाचा भरपूर उपयोग केला. एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवत होती. सरांभोवती प्रचारकार्यात जास्त मेहनत घेणाऱ्यांत सजातीय लोक बऱ्यापैकी दिसत होते व त्यांतील काहीजण त्यांचे नातेवाईक होते. पण त्या सगळ्यांचे विचार जातीच्या मुद्द्यापुरते तरी सरांशी जुळण्यासारखे वाटत नव्हते. त्यातील काहीजण मला बोललेसुद्धा. 'आपल्यापैकी फक्त सरच निवडून येऊ शकतात, मुळात आपले लोक पाच टक्केसुद्धा नाहीत. पण सरांना सगळ्या लोकांमध्ये मान आहे. अगदी सरांना मत न देणारासुद्धा त्यांच्याशी फार आपुलकीने वागेल, त्यामुळे आपण जोरात प्रयत्न केला पाहिजे, तर आपला माणूस निवडून येईल.' अशावेळी मी काहीच बोलत नव्हतो.

यथावकाश मतमोजणी झाली, एकूण ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत झावरेसर तिसऱ्या क्रमांकाची मते मिळवून निवडून आले. पुण्यातील इतर उमेदवार तर हरले, पण विशेष म्हणजे प्रेसिडेंटच्या उमेदावारासमोर अगदी नवख्या असलेल्या उमेदवाराला २५ टक्के मते जास्त मिळाली होती. जातीनिहाय मतदान झाले नाही, हे तर अगदी स्पष्टच होते. अन्यथा, सर निवडून तर आलेच नसते, पण सगळ्यात शेवटी राहिले असते.

या अनुभवानंतर माझ्या मनात मात्र काही प्रश्न उभे राहिले.

१. मतमोजणी होती म्हणून नेमके चित्र बाहेर आले, पण अशी परिस्थिती नसते तेव्हा किंवा परिस्थिती असूनही स्पष्ट कौल नसतो, तेव्हा जनमानसात काय संदेश जात असेल?

२. कुठल्याही सार्वजनिक कार्यात, एखाद्या माणसाने जातीचा आधार घेऊन समूह बांधण्याचा प्रयत्न केल्यास, विरोधी मत असतानाही आपण (निदान) ते का मांडत नाही? मी स्वत:ही याला काही वेळेस अपवाद ठरलो नाही. विशेषत: या गोष्टींचा तिटकारा असूनसुद्धा!

३. आपल्या देशात होणाऱ्या अनेक निवडणुकांत वेगवेगळ्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीतील मतदार असताना, राजकीय लोकांना बोलण्यातील संयम राखण्यासाठी किती कसरती कराव्या लागत असतील?

४. एकाच वेळी जात आणि वर्ण अशा दोन्हीतही मोडणाऱ्या ब्राह्मण वर्गातील 'भला माणूस' सार्वजनिक निवडणुकीत

उतरल्यास, लोक बऱ्याच वेळा त्यांना स्वीकारत नाहीत. अशावेळी हे लोक फ्रस्ट्रेशनमध्ये जातात व सर्व खापर जातीव्यवस्थेवर फोडताना दिसतात. यात अनेक कारणांबरोबर विशिष्ट व्यक्तिगत जीवनपद्धतीमुळे सामान्य लोकांना ते आपल्यातील वाटत नाहीत, हे कारण असेल का? की जातीव्यवस्थाच?

५. प्रसारमाध्यमात समाजाचे प्रतिबिंब उमटतेच, की गर्दीच्या मानसशास्त्रामुळे निर्माण होणाऱ्या वाचाळतेचे प्रतिबिंब उमटतेय, हे कळायला काही मार्ग दिसत नाही. यांच्याद्वारे जातीचा बागुलबुवा जेवढा उभा केला जातो, तो खरंच तेवढा आहे का?

६. माझ्यासारख्या माणसाला जातीच्या आधारावर कधीही कमी लेखणे किंवा डावलणे याचा अनुभव आलेला नाही; परंतु जेव्हा दलित वर्गातील एखाद्या व्यक्तीला रोजच्या जीवनात असा अनुभव येत असेल आणि मग त्याने आक्रस्ताळेपणाने प्रतिक्रिया दिली तर ती किती प्रमाणात क्षम्य मानावी? अगदी याच्या विरूद्ध एखाद्या ब्राह्मण व्यक्तीने प्रकट केलेला उद्वेग, त्याला एकदम संकुचित मनोवृत्तीचा ठरवणार नाही का?

७. जातीचा मुद्दा पूर्णत: कसा दुर्लक्षित करता येईल? बऱ्याच वेळा नुसत्या थोड्या बोलण्यावरून एखाद्या माणसाची जात लक्षात येते! अशा परिस्थितीत एखाद्या कुशल संघटकाने, त्या गुणदोषांचा उपयोग करून घेण्यासाठी जातीचा निकष लावला तर त्याला एक ‘मॅनेजमेंट पद्धत’ असे मानता येईल का?

या बाबतीत उदाहरण द्यायचे झाल्यास पु.ल.नी म्हटल्याप्रमाणे ‘तसं नावात काही नसतं, पण एखादा ‘बजरंग दगडू दांगट’ नावाचा मुलगा गणितात फार हुशार आहे असं म्हटल्यावर काय वाटतं?’

८. ‘उदंड कायदे, पण अंमलबजावणी यथा तथा’ असा समज आपल्या देशातील कायद्यांबाबत सार्वत्रिक दिसून येतो, पण कुठल्याही सार्वजनिक कार्यात जातीच्या आधारे ‘अपील’ करणे भारतात तरी शक्य नाही. (काही तुरळक अपवाद वगळता) निदान औपचारिकपणे! अशा कायद्यांमुळे काय फरक पडला, या प्रश्नाला ‘हा कायदा नसता तर काय चित्र दिसले असते?’ हे उत्तर योग्य राहील का? आणि हे जर योग्य उत्तर असेल तर अनौपचारिक चर्चांमध्ये आपले मत मांडत राहिल्याने किती फरक पडेल?

९. काहीही ध्यानीमनी नसताना, दोन-चार लोकांनी जातीचा मुद्दा उपस्थित केल्यावर एकदम सगळे चित्र त्याआधारे फिरतेय की काय, अशी धास्ती मला का वाटली असावी? की दुय्यम, नेतृत्वाकडून कायमच असल्या प्रकारचे मुद्दे जोराने मांडण्यात येत असल्याने, त्याच्या प्रभावाखाली आपली विचारप्रक्रिया पूर्वग्रहदूषित होत असेल?

वरील प्रश्न मला, हे काही अनुभव असल्याने फार प्रकर्षाने जाणवले असे वाटते पण व्यक्तिगत अनुभव प्रमाण मानून कोणी सामाजिक सिद्धांत मांडायला लागल्यास, मी तर त्याची साधारण बुद्धिमत्तेचा माणूस (अपरिपक्व) अशी गणना करीत आलोय. निश्चितपणे मी माझा वरील अनुभव प्रमाण धरून मते बनवली नाहीत, पण जे विषय यापूर्वीसुद्धा मला चिंतन करण्यास प्रवृत्त करीत होते, त्यांच्यावर मी अधिक भर का दिला नाही, याची खंत मात्र मला जरूर वाटते.

पूर्णवेळ शैक्षणिक आयुष्य संपण्याच्या आणि व्यवहारी जगात पूर्णवेळ उतरण्याच्या काळापर्यंत जी आपली वैचारिक बैठक झालेली असते, तीच बहुतांश वेळेस व्यक्तीच्या वैचारिक वाढीची मर्यादा दिसून येते. (जसे शरीर एका विशिष्ट वयापर्यंत वाढते; पुढे बदल होत राहतात, पण विशेष नाही). विचार करीत बसायला वेळ, श्रम व तात्कालिक आराखडे यातून उसंत मिळत नाही, हे हमखास कारण पुढे करण्यात येते व त्यात बरेच तथ्य आहे. पण हे कारण ज्या वयोगटातील व्यक्तींकडून दिले जाते, त्यांत प्रामुख्याने ३५ च्या पुढचा वर्ग मोडतो. या वयोगटाला आपण निश्चितच तरुण म्हणत नाही!

जंगलीपणापासून ते सध्याच्या मानवी जीवन पद्धतीवर एक नजर टाकल्यास, एखाद्याचे समाजातील स्थान हे त्याच्या शारीरिक ताकदीवरून ठरवण्याचे दिवस तर केव्हाच संपले आहेत. मग मला आणखी एक प्रश्न पडलाय...

तरुण कोण?

निकालानंतर एका जवळच्या मित्राची प्रतिक्रिया- ‘आपण मराठ्यांनी अखेर महादजी शिंदे नंतर अटकेपार झेंडा लावला.’ त्या वेळी मी त्याला काही उत्तर दिले नाही, पण...

आता?... नक्कीच उत्तर देणार!

मी जेव्हा माझ्यासाठी मुलगी पहायला गेलो होतो, तेव्हा होणाऱ्या गप्पांत भांडारकर संस्थेवर संभाजी ब्रिगेडने केलेल्या हल्ल्याचे एकजण समर्थन करीत होता, त्यावेळी बाकीच्या लोकांचे आपल्या बोलण्या-वागण्याकडे बारीक लक्ष आहे हे लक्षात येत असूनही, मी माझी मते काहीही हातचे राखून न ठेवता मांडली होती. पण गेल्या चार-पाच वर्षांत मात्र व्यावसायिक जगात पूर्णवेळ उतरल्यावर, रोजच्या वर्तमानपत्रांचे वाचनसुद्धा नीट झाले नाही. प्रश्न नुसत्या वेळेचा नव्हता; तर कल कशाकडे आहे हा होता. पूर्वी रोज चार-पाच तास व्यायाम करणाऱ्या मला, गेल्या तीन-चार वर्षांत पंधरा-वीस मिनिटेसुद्धा व्यायाम करणे जमले नाही. पण आता थोडेसे स्थैर्य आल्यावर माझ्या पेशाकडे बघण्याचा दृष्टिकोन तर बदलत आहेच, पण अर्थार्जनाव्यतिरिक्त इतरही तितकेच महत्त्वाचे मुद्दे मला पूर्वीप्रमाणे विचार करण्यास भाग पाडत आहेत. थोडक्यात, मी आणखी तरुण झाल्याची जाणीव मला होत आहे.

**चंद्रशेखर पाटील**
Mob.: 9822301989
mrcmpatil@gmail.com

(नांदेडचा चंद्रशेखर पाटील गेल्या पाच वर्षांपासून पुणे येथे चार्टर्ड अकाउंटंट म्हणून काम करीत आहे. पाच वर्षांपूर्वी त्याने ‘साधना’तच लिहिलेला पहिलाच लेख (हरिभाऊ महालेंच्या सहवासातील ‘ते’ दिवस) विशेष गाजला होता. हा त्याचा केवळ दुसरा लेख.)

# तुम्ही साधना साप्ताहिकाचे वार्षिक वर्गणीदार आहात?






फक्त ४०० रुपयांत
४४ अंक आणि ४ विशेषांक
(संस्थांसाठी रु. ५००/-)










: संपर्क :

**साधना साप्ताहिक**

९२६ सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४५१७२४.

Email : weeklysadhana@gmail.com
Website : www.weeklysadhana.com

साधना साप्ताहिक
९ जानेवारी २०१०

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून

'साधना प्रकाशन' प्रकाशित करीत आहे

मराठी साहित्यातील आगळेवेगळे पुस्तक

## कथा आणि कथेमागची कथा

(भाग १ आणि भाग २ : प्रत्येकी ३२० पाने)

दोन्ही भागांची एकूण किंमत : रु. ६००/-

प्रकाशनपूर्व सवलतीत : रु. ३५०/-

(पोस्टाने घरपोच : रु. ४००/-)

पुस्तकाची उपलब्धी : २० फेब्रुवारी २०१०

मराठीचे आजचे आघाडीचे लेखक राजन खान यांनी स्वत:च्या १४ वैशिष्ट्यपूर्ण कथांमागची कथा सांगणारी लेखमाला गेल्या वर्षी 'साधना' साप्ताहिकातून लिहिली.

सर्व स्तरातील व भिन्न अभिरूची असलेल्या अनेक वाचकांना ती लेखमाला विशेष आवडली.

कथेमागची कथा वाचून मूळ कथा वाचण्याची उर्मी अनावर झाल्याने अनेक वाचकांनी एकेका कथेसाठी राजन खान यांचे कथासंग्रह विकत घेतले.

पण राजन खान यांच्या त्या १४ कथा त्यांच्या विविध कथासंग्रहात असल्याने काही वाचकांना मूळ कथा वाचायला मिळाल्या नाहीत.

म्हणून 'कथेमागची कथा' लेखमालेतील १४ लेख आणि मूळ १४ कथा असा ६४० पानांचा मजकूर पुस्तकरूपाने (दोन भागात) प्रकाशित होत आहे.

सर्जनशील लेखनप्रक्रिया चालते तरी कशी, याची झलक दाखविणारा अभिनव प्रयोग म्हणजे हे पुस्तक!

कथेविषयी कुतुहल असणाऱ्यांच्या संग्रही हवेच!

: संपर्क :

**साधना ग्रंथप्रदर्शन आणि मीडिया सेंटर**

४३१, शनिवार पेठ, पोलिसचौकीसमोर, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४४५९६३५.

(सकाळी १० ते सायं. ८. बुधवार बंद)